cmyk

## संपादकीय

### स्मार्ट सिटीची नियोजनाला तिलांजली!

पुण्यात कोकणासारखा धो धो पाऊस पडत नाही. मात्र, मराठवाड्यासारखा हा टापू पावसापासून वंचितही राहत नाही. त्या अर्थी पुणे हे मध्यम पावसाचे शहर. पुण्याने पूर पाहिले नाहीत, अशातला भाग नाही. १२ जुलै १९६१ मध्ये पानशेत धरण फुटल्याने पुण्यावर ओढवलेल्या जलप्रलयाच्या आठवणी आजही पुणेकर विसरलेले नाहीत. तथापि, हा प्रलय धरण फुटल्याच्या आपत्तीतून निर्माण झाला होता. त्यानंतरही पुण्याने कमी अधिक प्रमाणात पूर अनुभवले. २००५ मध्ये तर पावसाने संबंध महाराष्ट्राला तडाखा दिला. त्यातून पुणेही सुटले नव्हते.


# दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–९७ | रविवार दि.२८ जुलै २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | • पाने– ६ | किंमत ३ रूपये


## कुपवाडामध्ये चकमक, एक जवान शहीद,

श्रीगनरः जम्मू- काश्मीरच्या कुपवाडा जिल्ह्यातील मच्छल सेक्टरमध्ये दहशतवाद्यांशी झालेल्या चकमकीत एका मेजर रँक अधिकाऱ्यासह ५ भारतीय लष्करी जवान जखमी झाले. पाचही जखमी जवानांना त्या ठिकाणाहून उपचारासाठी हलवण्यात आले. दरम्यान, जखमी जवानांपैकी एक शहीद झाला असल्याची माहिती संरक्षण अधिकाऱ्यांनी दिली आहे. या कारवाईदरम्यान एका पाकिस्तान दहशतवाद्याला ठार करण्यात आले आहे. जम्मू–काश्मीरच्या कुपवाडा जिल्ह्यात शनिवारी सकाळी नियंत्रण रेषेवर (एलओसी) भारतीय लष्कर आणि दहशतवाद्यांमध्ये चकमक उडाली.

## दिल्लीत उद्या महिला काँग्रेसचे आंदोलन

**मुंबई | प्रतिनिधी**

महिलांच्या ३३ टक्के आरक्षणाची अंमलबाजवणी, प्रचंड वाढलेली महागाई व महिला सुरक्षेच्या मुद्यावर महिला काँग्रेस आक्रमक झाली आहे. महिलांचे हे तीन ज्वलंत प्रश्न घेऊन अखिल भारतीय महिला काँग्रेसच्या अध्यक्षा अलका लांबा यांच्या नेतृत्वाखाली दिल्लीत २९ जुलै रोजी आंदोलन करण्यात येणार आहे. या आंदोलनात देशभरातील महिला काँग्रेस कार्यकर्त्या मोठ्या संख्येने भाग घेणार आहेत, अशी माहिती महिला काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्षा संध्या सव्वालाखे यांनी दिली. संध्या सव्वालाखे पुढे म्हणाल्या की, भारतीय जनता पक्षाच्या सरकारने लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर महिलांसाठी ३३ टक्के आरक्षण मंजूर केले परंतु त्याची अंमलबजावणी अद्याप केलेली नाही. सरकारने या आरक्षणाच्या अंमलबजावणीसाठी जनगणनेची अट घातली आहे. २०२१ साली होणारी जनगणना अद्याप केली नाही.

◀◀ पान २ वर

# केंद्र सरकारचा शेतीचा ॲक्शन प्लॅन गेला कुठे ?

### सरकार स्थापन होताचा याचा गाजावाजा केला मात्र दिड महिना लोटला तरी शब्द निघेना

**मुंबई | प्रतिनिधी**

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तिसऱ्यांदा पंतप्रधान पदाची शपथ घेतल्यानंतर शेतकऱ्यांना मोठे सरप्राईज देणार आणि त्यासाठी १०० दिवसांचा ॲक्शन प्लॅन राबविला जाणार, याची जोरदार चर्चा होती. कृषी मंत्रालय यासाठी झपाटून काम करत असल्याचा दावाही कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी केला होता. हा प्लॅन कसा राबविणार याचे नियोजन सुरु असल्याचे त्यांनी सांगितले होते. तसेच या ॲक्शन प्लॅनमध्ये नेमके काय असणार याची पण माहिती दिली. मात्र नरेंद्र मोदी पंतप्रधान होऊन आणि शिवराजसिंह कृषिमंत्री होऊन सुमारे दिड महिना झाला तरी शेतीचा ॲक्शन गेला कुठे? असा प्रश्न आता उपस्थित होत आहे.**



पंतप्रधान मोदी यांनी ९ जुलैला पंतप्रधान पदाची तिसऱ्यांदा शपथ घेतल्यानंतर दुसऱ्या दिवसांपासूनच १०० दिवसांच्या ॲक्शन प्लॅनची चर्चा सुरु झाली. २०४७ मध्ये विकसित भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी पहिल्या १०० दिवसांमध्ये प्रत्येक मंत्रालयाने काय करायचे? याचा अंजेडा तयार करण्यास सांगितले होते.

◀◀ पान २ वर

#### केवळ घोषणा, प्रत्यक्षात शुन्य काम

नुकत्याच प्रसिध्द झालेल्या झालेल्या अर्थिक पाहणी अहवालात शेतीत मोठ्या बदलाची गरज असल्याचे म्हटले. पण अर्थसंकल्पात पोकळ घोषणा आणि तुटपुंजी निधीची तरतूद याशिवाय शेतीच्या वाट्याला काहीच आले नाही. त्यामुळे मोदी यांनी पहिल्या १०० दिवसांचा ॲक्शन प्लॅन केवळ जुमला होता, अशी टिका आता केली जात आहे.

# लोकसभेप्रमाणे विधानसभेलाही बीडची जनता साथ देईल

### » जयंत पाटील यांचा विश्वास; बीडसह आष्टी मतदारसंघाचा घेतला आढावा

**बीड| प्रतिनिधी**

**लोकसभेला बीड जिल्ह्यातील जनतेने शरद पवार आणि आमच्या पक्षाला साथ दिली आता विधानसभेलाही देतील. जिल्ह्यातील ६ आमदार आमचेच होतील, असा विश्वास राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी पत्रकार परिषदेत व्यक्त केला. बीडसह आष्टी मतदार संघाचा आढावा घेण्यात आला असून आणखी चार मतदार संघाचा आढावा घेण्यात येणार असल्याचेही ते म्हणाले. निष्ठावंत कार्यकर्ता संवाद मेळाव्यानिमित्त ते बीडमध्ये आले होते.**

यावेळी पुढे बोलताना जयंत पाटील म्हणाले, बीड जिल्ह्यातील ६ मतदार संघात महाविकास आघाडीकडून जोरदार तयारी करण्यात येत आहे. पुर्वी आमच्याकडे सर्वच मतदारसंघ होते. यावेळी आघाडी असल्याने मित्रपक्षांबरोबर चर्चा केल्यावर मतदारसंघाविषयी चित्र स्पष्ट होईल, असे ते म्हणाले. मुख्यमंत्री

◀◀ पान २ वर



#### “ जयदत्त क्षीरसागर आमच्या संपर्कात नाहीत

जयदत्त क्षीरसागर यांनी मध्यंतरी शरद पवार यांची भेट घेतली होती. त्यामुळे पवार गटात येतील, असे म्हटले जात होते. ते आले तर आ. संदिप क्षीरसागरांचे काय? असा प्रश्न उपस्थित केला जात होता. यावर बोलताना जयंत पाटील म्हणाले, जयदत्त क्षीरसागर हे आमच्या संपर्कात नाहीत, आमच्याकडे असलेली माणसे चांगली आहेत, असे ते म्हणाले.

## बीड जिल्ह्याचा पाणी प्रश्न हाती घेऊन तडीस लावण्याचा संकल्प–जयंत पाटील





बीडः जिल्ह्यातील पाणी प्रश्न विशेषतः हातात घेऊन तडीला लावण्याचा संकल्प हाती घेऊन आपण काम करूया. शेतकरी–कष्टकऱ्यांपर्यंत, सर्वसामान्यांपर्यंत पोहोचून, आपल्याला जनतेची कामे करावी लागतील. बीड जिल्ह्यातील राष्ट्रवादीचा प्रत्येक कार्यकर्ता हे काम इमानेइतबारे करत आहे. त्यामुळे पक्षाला विक्रमी विजय मिळणारच आहे,

#### जिल्ह्यातील सर्व उमेदवार निवडून आणू– आ.संदीप क्षीरसागर

बीड जिल्हा हा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा आणि पवार साहेबांच्या विचारांचा बालेकिल्ला आहे. बीड जिल्ह्यातील जनता ही पुरोगामी विचारांशी एकनिष्ठ आहे. यापुर्वीचा इतिहास पाहता आत्तापर्यंत पवार साहेबांची साथ जिल्ह्याने कधीच सोडली नाही. मग २०१९ ची विधानसभा निवडणुक असेल किंवा नुकतीच पार पडलेली लोकसभा निवडणुक असेल. प्रत्येक वेळी जिल्ह्यातील जनतेने पुरोगामी विचारालाच कौल दिला आहे. आता येणाऱ्या विधानसभा निवडणुकीतही राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष किंवा महाविकास आघाडीसाठीचे सर्व उमेदवार निवडून आणू. जिल्ह्यातील सहाच्या सहा मतदारसंघात आपले उमेदवार निवडून येतील. असा विश्वास आ.संदीप क्षीरसागर यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना व्यक्त केला.

मात्र आता पक्षाची ध्येयधोरणे, पक्ष विचार

◀◀ पान २ वर

#### ‘ओबीसींचे १०० आमदार निवडून आले पाहिजेत’



सांगली : प्रतिनिधी

‘ओबीसींच्या डोक्यात खूळ बसले आहे की, हिंदू खतरे में हैं. पण हे खूळ बाजूला करावे लागेल. हे खूळ भाजपने उभे केले आहे. एक छगन भुजबळ निर्माण करून चालणार नाही, अनेक भुजबळ उभे करावे लागणार आहेत. ओबीसींचे १०० आमदार निवडून आले पाहिजेत’, असे प्रकाश आंबेडकर म्हणाले.

वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांची आरक्षण बचाव यात्रा शनिवार सांगलीत पोहोचली. यावेळी ते बोलत होते. ते म्हणाले, ओबीसीच्या ५७ जागा राखीव आहेत. तर याच्यावर नजर असणार आहे. या निवडणुकीत आरक्षण बचाव हा मुद्दा असणार आहे.

◀◀ पान २ वर



#### निती आयोगाच्या बैठकीतून ममता बाहेर

नवी दिल्ली : येथे शनिवारी झालेल्या निती आयोगाच्या बैठकीला पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी उपस्थित राहिल्या होत्या. उपस्थित राहिलेल्या त्या एकमेव विरोधी नेत्या होत्या, मात्र निती आयोगाच्या बैठकीतून त्या मध्येच बाहेर पडल्या. बैठकीतून बाहेर पडल्यानंतर

◀◀ पान २ वर

## पवार साहेब, एका वाक्यात उत्तर द्या

### चंद्रकांत पाटलांनी आरक्षणाच्या मुद्द्यावरून शरद पवारांना घेरले

**मुंबई | प्रतिनिधी**

**शरद पवारांनी मुख्यमंत्री असताना मराठ्यांना ओबीसीतून आरक्षण का दिले नाही? याचे एका वाक्यात उत्तर द्या, असे आव्हानच चंद्रकांत पाटील यांनी दिले आहे. ते मीडियाशी संवाद साधत होते. मराठा आरक्षणावरुन पवारांनी महायुतीवर हल्लाबोल केल्यावर चंद्रकांत पाटील यांनी पवारांना घेरण्याचा प्रयत्न केला आहे.**



पाटील पुढे म्हणाले, दरवर्षी दोन तीन दिवस प्रश्न निर्माण होतो, त्यावेळी प्रशासन सगळे करते. काठावरील गावांना शिफ्ट केले जाते. अनेक वेळा त्या ठिकाणच्या लोकांची अपरिमीत हानी होते. तीन आठवडे अगोदर अशी स्थिती झाली होती. आता तशी होऊ नये एवढीच देवाकडे प्रार्थना आहे. पावसामुळे मोठ्या प्रमाणात नुकसान झालं आहे. कोल्हापूरात पंचनामे सुरू झाले आहेत, अशी राज्याचे मंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिली.

मराठा आणि ओबीसी आरक्षणाच्या प्रश्नावर शरद पवार यांनी राज्य सराकरचे चांगलेच कान टोचले आहेत. सरकारने दोन्ही समाजाच्या नेत्यांशी परस्पर चर्चा केली. त्यामुळे वाद वाढत गेला. दोन्ही समाजाच्या नेत्यांसोबत एकत्र चर्चा केली असती तर वाद वाढला नसता. सरकारची हीच मोठी चूक होती, अशा शब्दात शरद पवार यांनी राज्य सरकारवर ताशेरे ओढले होते. शरद पवार यांच्या या टीकेचा भाजप नेते आणि राज्याचे मंत्री चंद्रकांत पाटील यांनी खरपूस समाचार घेतला आहे. पवारांनी मुख्यमंत्री असताना मराठ्यांना ओबीसीतून आरक्षण का दिलं नाही? याचं एका वाक्यात उत्तर द्या, असे आव्हानच चंद्रकांत पाटील यांनी दिले आहे.

# आरक्षणाला धक्का लागल्यास राजकारणातून संन्यास घेणार

### प्रफुल्ल पटेल यांचे मोठे वक्तव्य; अपप्रचाराच्या मुद्दयावर विरोधकांवर केला हल्लाबोल

**भंडारा | प्रतिनिधी**

**आरक्षणाला जर धक्का लागेल तर मी शंभर टक्के राजकारणातून संन्यास घेणार आहे. कारण त्यावेळी मला कुठल्याही पदावर आणि राजकारणात राहण्याचा कोणताही अर्थ नाही, म्हणूनच मी त्याग करेल, असा गौप्यस्फोट राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे नेते आणि खासदार प्रफुल्ल पटेल यांनी केला आहे. या देशात आरक्षण, हे संविधानात डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेलं आहे. त्या आरक्षणाला कोणीही धक्का लावू शकत नाही. त्याचा मूळ ढाचा कोणीही बदलू शकत नाही, असेही ते म्हणाले.**



लोकसभेच्या निवडणुकीत उगीचच अपप्रचार एवढा झाला, की लोकं त्याला बळी पडलेत. पण आता लोकांच्या लक्षात आलेले आहे आणि आमच्यासारखे अनेक लोक जे संसदेत संविधानाची शपथ घेऊन बसलेली आहेत, ते असे होऊ देणार नाही. असे स्पष्ट वक्तव्य प्रफुल्ल पटेल यांनी केले आहे.

मराठ्यांना आरक्षण मिळालंचे पाहिजे, यावर आमचे सरकार ठाम आहे. त्या दृष्टीने विधानसभेत विधेयक पारित झाला, कायदा पण बनला असून दहा टक्के आरक्षण दिले आहे. आता ज्यांना तेही पटत नाही, ते विरोधाभास करतात. हेही तेवढेच सत्य आहे. काँग्रेस आणि इतर सर्वच पक्ष हे अनेक वर्ष सत्तेत राहिले आहेत. मराठ्यांच्या आरक्षणाचा प्रश्न कालचा,

◀◀ पान २ वर

#### *महाराष्ट्रात महायुतीचे सरकार येणार*

*महाराष्ट्रात तिन्ही पक्ष महायुती म्हणून काम करत आहेत आणि यशस्वीरीतीने या महाराष्ट्रमध्ये निवडणूकमध्ये सामोरे जाणार आहोत. महाराष्ट्रमध्ये आपले सरकार बनवणार, असे वक्तव्य प्रफुल पटेल यांनी केले.*

#### बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.२७ जुलै २०२४

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू : २.५० क्विंटल | २,९०१ | २,९०१ | २,९०१ |
| ज्वारी/हायब्रिड :५७.५० क्विंटल | २,२४१ | २,७४१ | २,४८३ |
| मूग :१४.५० क्विंटल | १,९५० | ३,०४१ | २,४५५ |
| तूर : १४.५० क्विंटल | १०,२०० | १०,३७२ | १०,२८६ |
| उडीद : ०.५० क्विंटल | ४,००१ | ४,००१ | ४,००१ |
| बाजरी: ७.५० क्विंटल | २,६२२ | ३,३५५ | २,९०३ |
| चिंच/लोकल: २०.०० क्विंटल | १,१०० | ३,५५० | २,३२५ |
| सोयाबीन: १०५.०० क्विंटल | ४,४०० | ४,४२० | ४,४१० |
| हरभरा: २.०० क्विंटल | ५,३०० | ६,५५१ | ५,९२५ |

# तो दिवा महाराष्ट्राच्या तुरुंगात

### शरद पवार यांचा अमित शहांवर पलटवार


**संभाजीनगर | प्रतिनिधी**

**पुणे येथे काही दिवसांपूर्वी भाजपाच्या राज्य कार्यकारणीची बैठक पार पडली. या बैठकीच्या समारोपाच्या वेळी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रमुख शरद पवार यांच्यावर देशातील भ्रष्टाचाराचे सरदार असल्याची टीका केली होती. अमित शाह यांच्या या टीकेला शरद पवार यांनी शनिवारी या टीकेची परतफेड करत तो दिवा महाराष्ट्राच्या तुरुंगात राहिल्याचे आम्ही पाहिले अशी खोचक टीका केली.**

#### आमच्यासह जरांगे, भूजबळ, हाके यांना चर्चेला बोलवा

शरद पवार पुढे बोलताना म्हणाले की, मराठा आरक्षणाबाबत सुसंवाद करण्याची माझ्या पक्षाची भूमिका असेल. सरकारने आता नव्या पिढीशी सुसंवाद करण्याची गरज आहे. सरकारने जरांगे, भुजबळ, हाके आणि आम्हाला चर्चेला बोलवावे आणि याप्रकरणी तोडगा काढला पाहिजे. शिवाय आरक्षणप्रकरणी मला एक चिंता वाटत आहे. ती म्हणजे दोन समाजात दरी निर्माण होते की काय असे चित्र आहे. विशेषतः मराठवाड्याच्या दोन ते तीन जिल्ह्यांत अधिक काळजी घेण्याची गरज आहे. ही स्थिती बदलण्यासाठी आमच्यासारख्या नेत्यांनी लक्ष दिले पाहिजे. असे शरद पवार म्हणाले.

छत्रपती संभाजीनगर येथे शरद पवार आले असता आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना अमित शाह यांनी केलेल्या टीकेवर प्रत्युत्तर देताना पलटवार केला. यावेळी प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींनी शरद पवार यांना सवाल केला की, अमित शाह यांनी तुमच्यावर भ्रष्टाचाऱ्यांचा सरदार असल्याची टीका केली आहे. त्यावर शरद पवार म्हणाले की, गुजरातमधून तडीपार झालेला व्यक्ती देशाच्या गृहमंत्रीपदी विराजमान झाल्याचे आपल्याला पहायला मिळत आहे, अशी बोचरी टीका केली. यावर भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी सुर्याला दिवा दाखविण्यासारखा हा प्रकार असल्याचे प्रत्युत्तर दिले होते. त्यावर शरद पवार यांनी पुन्हा पलटवार करताना म्हटले की, तो दिवा तुरुंगात राहिल्याचे आम्ही पाहिले आहे. शरद पवार



यांनी केलेल्या या बोचऱ्या टिकेमुळे भाजपा नेत्याकडून तिखट प्रतिक्रिया येत आहेत. दरम्यान, शरद पवार म्हणाले की, राज्यात विधानसभेच्या निवडणुका होणार आहेत. त्यामुळे राज्य सरकारकडून योजनांच्या घोषणा केल्या जात आहेत. परंतु राज्याच्या तिजोरीत पैसा नाही. त्यामुळे निवडणुकीपुरते एक, दोन हप्ते महिलांना दिले जातील. त्यानंतर दिले जाणार का? हा प्रश्न आहे. सरकारला या योजनेचा लाभ जनतेला द्यायचा होता तर ही योजना

◀◀ पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# स्मार्ट सिटीची नियोजनाला तिलांजली !

पुण्यात कोकणासारखा धो धो पाऊस पडत नाही. मात्र, मराठवाड्यासारखा हा टापू पावसापासून वंचितही राहत नाही. त्या अर्थी पुणे हे मध्यम पावसाचे शहर. पुण्याने पूर पाहिले नाहीत, अशातला भाग नाही. १२ जुलै १९६१ मध्ये पानशेत धरण फुटल्याने पुण्यावर ओढवलेल्या जलप्रलयाच्या आठवणी आजही पुणेकर विसरलेले नाहीत. तथापि, हा प्रलय धरण फुटल्याच्या आपत्तीतून निर्माण झाला होता. त्यानंतरही पुण्याने कमी अधिक प्रमाणात पूर अनुभवले. २००५ मध्ये तर पावसाने संबंध महाराष्ट्राला तडाखा दिला. त्यातून पुणेही सुटले नव्हते. मात्र, मागच्या काही वर्षांचा धांडोळा घेतला, तर या पुरास निसर्गाबरोबरच मानवी कृतीही कारणीभूत असल्याचे दिसते. पुण्यातील २५ जुलैच्या पुराबाबतही असेच म्हणावे लागेल. पुण्यातील अतिवृष्टी व पूरसदृश स्थितीमुळे एकूणच शहरांच्या नियोजनाचा प्रश्न ऐरणीवर आल्याचे दिसून येते. पुणे व पिंपरी या मेट्रोसिटींचा विकास हा प्रत्यक्षात किती तकलादू आहे, याचे सांप्रत पूर हे जिवंत उदाहरण आहे.

खडकवासल्यासह पानशेत, वरसगाव, टेमघर ही चार धरणे पुण्याची गरज भागवतात. या धरणांसह भीमा प्रकल्पातील अन्य धरणांतून होणाऱ्या विसर्गावर उजनी जलाशयाला विसंबून राहावे लागले. यंदा जूनमध्ये फारसा पाऊस झालाच नाही. त्यामुळे धरणातून पाणी सोडण्याचा प्रश्नच निर्माण झाला नाही. तथापि, धरणाच्या पाणलोट क्षेत्रासह सर्वत्रच बुधवारी रात्री पावसाने जोर पकडल्याने पाणीसाठ्यात लक्षणीय वाढ झाली. त्यामुळे धरणातून पाणी सोडणे भाग पडले. जलसंपदा विभागाकडून खडकवासलातील विसर्ग टप्प्याटप्प्याने वाढविण्यात आला. हा विसर्ग ४० हजार क्युसेकवर गेल्यानंतर पुण्यातील सिंहगड रस्ता, डेक्कन परिसरात बिकट परिस्थिती निर्माण झाल्याचे दिसून आले. तेथील सोसायट्या, घरांमध्ये शिरलेले पाणी, पाण्यावर तरंगणाऱ्या गृहोपयोगी वस्तू, वाहने, कमरेएवढ्या वा गळ्याएवढ्या पाण्यातून वाट काढणारे पुणेकर व जलमय रस्त्यावरून पुढे सरकणाऱ्या एनडीआरएफच्या बोटी हे दृश्य पाहिल्यानंतर पुणे ही खरोखरच स्मार्ट सिटी आहे का, असा प्रश्न निर्माण झाला. मागच्या काही वर्षांत पुण्याचा अनिर्बंध विकास झाला. विकासाचा हा वेग पकडताना नियमांची मोडतोड करण्यात आली. कायद्याला वळसे घालण्यात आले. रिव्हर व्ह्यूच्या नावाखाली अगदी नदी पात्रात वा पूररेषेतही टोलेजंगी इमारती उभ्या राहिल्या. त्यात अगदी लोकप्रतिनिधी, अधिकारी, बिल्डर लॉबीपासून ते ठेकेदारांपर्यंत प्रत्येकाचे हात कसे आणि किती ओले झाले असतील, हा संशोधनाचा विषय ठरतो. कोणत्याही शहराच्या विकासातला सर्वांत महत्त्वाचा घटक म्हणजे शहर नियोजन होय. परंतु, नियोजनाला तिलांजली देतच अलीकडे शहरांची विकास प्रक्रिया गतिमान करण्यात आली आहे. डांबरी रस्त्यांऐवजी सिमेंटचे रस्ते निर्माण करण्याचे तर अलीकडे पॅडच निर्माण झाले आहे. का तर म्हणे लाईफ जास्त. परंतु, सिमेंटचे रस्ते हे भविष्याकरिता अत्यंत घातक असल्याचे शास्त्रज्ञ मंडळींचे म्हणणे आहे. सिमेंटच्या रस्त्यांमध्ये पाणी मुरत नाही. त्याचे दोन प्रमुख तोटे होतात. एक म्हणजे भूजल पातळी वाढविण्याच्या मार्गात अडथळा येतो आणि दुसरा म्हणजे पाण्याचा निचरा होऊ न शकल्याने पूरस्थितीची शक्यता वाढते. उन्हाळ्यात हेच सिमेंटचे रस्ते उष्णता वाढविण्यासही कारणीभूत ठरतात. त्यामुळे महापालिकेने अशा रस्त्यांचा पुनर्विचार करायला हवा. नदी सुशोभिकरण हा अलीकडे अनेक स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आवडीचा विषय बनला आहे. मात्र, सुशोभिकरण वा नदीसुधार करताना नदीच्या मूळ प्रवाहाला तर आपण धक्का लावत नाही ना, याचा प्रशासनातील मंडळी विचार करत नाहीत. त्यातूनच पुराची तीव्रता वाढण्यास मदत होते. ड्रेनेज वा सांडपाणी व्यवस्था हा तर अत्यंत जटील विषय म्हणावा लागेल. पावसाळ्यापूर्वी नाले वा तत्सम सफाई केल्याचे कंठघोषात सांगितले जाते खरे. मात्र, यामध्ये बऱ्याच उणिवा राहतात व त्याचे परिणाम प्रत्यक्ष पावसाळा सुरू झाल्यानंतर दिसतात. एकूणच वाढत्या पुण्याचा विचार करता येथील ड्रेनेज व्यवस्थाही पुरेशी सक्षम असल्याचे दिसत नाही. पुणे, मुंबईच कशाला तर या शहरांखालोखाल असलेल्या नाशिक, कोल्हापूर, छत्रपती संभाजीनगरबाबतही असेच म्हणता येईल. धरण व्यवस्थापन वा पूर नियंत्रण हा पावसापाण्याच्या दिवसातील अत्यंत संवेदनशील विषय होय. पावसाळ्यात धरणातील पाण्याची आवक व विसर्ग यावर बारीक लक्ष ठेवावे लागते. त्यात थोडी गडबड झाली, तरी त्याचे परिणाम नदीकाठावरील लोकांना भोगावे लागतात. सध्या पुण्याच्या विसर्गावरूनही दावे प्रतिदावे होत आहेत. पूर्वसूचना न देता पाण्याचा विसर्ग करण्यात आल्याचा स्थानिकांचा दावा आहे. शिवाय विसर्ग ५० हजारांहून अधिक असावा, अशीही शंका व्यक्त केली जात आहे. केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ यांनीही धरणातून पाणी सोडताना अधिकची खबरदारी घ्यायला हवी होती, असे म्हटले आहे. काही असो. पण, पूर व्यवस्थापन करताना कोणत्याही त्रुटी राहणार नाहीत, याची खबरदारी घेतली पाहिजे. कोल्हापूर, सांगलीमध्येही पूरस्थितीने सर्वांच्या काळजाचा ठोका चुकवला आहे. प्रत्येक शहराला पावसाळ्याच्या दिवसात आज ना उद्या या दिव्यातून जावे लागू शकते. मात्र, बुडती ही शहरे, देखवेना डोळा, अशी अवस्था होऊ नये, याकरिता आत्तापासूनच कामाला लागले पाहिजे. याकरिता आपत्तीपूर्व व्यवस्थापन ही काळाची गरज असेल.

## धडाकेबाज कारवाई करणारी खनाळ यांची बदली तर पंकज जाधव रूजू

**जालना । प्रतिनिधी**

स्थानिक गुन्हे शाखेमध्ये एक वर्षापूर्वी रुजू झालेले पोलीस निरीक्षक श्री रामेश्वर खनाळ यांनी वर्षभरात धडाकेबाज कारवाई करण्यात आली होती . आशा पोलीस अधिकाऱ्याची बदली होणे म्हणजे गुन्हेगारी वाढणे असे सर्वसामान्य नागरिकाकडून बोलल्या जात आहे. आता त्यांची बदली लातूर इथे करण्यात आले.



जालना स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिस निरीक्षकपदी पंकज जाधव यांची नियुक्ती करण्यात आली. सदर बाजार पोलिस ठाण्यात कार्यरत असलेले पोलिस निरीक्षक पंकज जाधव यांच्याकडे जालना स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिस निरीक्षक पदाचा पदभार सोपवण्यात आलाय.

पोलिस निरीक्षक पंकज जाधव यांनी जालना स्थानिक गुन्हे शाखेचे मावळते पोलिस निरीक्षक रामेश्वर खणाळ यांच्याकडून आज गुन्हे शाखेची सूत्र स्वीकारली आहेत. जालना स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक रामेश्वर खनाल यांची लातूर येथील पोलिस प्रशिक्षण केंद्रात बदली करण्यात आली. त्यानंतर स्थानिक गुन्हे शाखेसाठी जिल्ह्यातील पोलीस निरीक्षक यांच्यात मोठी रस्सीखेच पाहायला मिळाली. आज स्थानिक गुन्हे शाखेची सूत्र सदर बाजार पोलीस ठाण्यात कार्यरत असलेले पोलीस निरीक्षक पंकज जाधव यांनी स्वीकारली आहेत. यावेळी बोलताना गुन्हे शाखेचे मावळते पोलीस निरीक्षक रामेश्वर खनाळ यांनी आपला अनुभव सांगत संपूर्ण जालना शहर व जिल्हावासियांनी केलेल्या सहकार्याबद्दल आभार मानले आहे. तसेच जेव्हापासून स्थानिक गुन्हे शाखा जालना येथे खणाल रुजू झाले तेव्हा पासूनचे बरेच अनुभव त्यांनी याप्रसंगी सांगितले आहे. त्यामध्ये नुकत्याच जालना शहरातील टांगा स्टॅन्ड येथे घडलेल्या एका तरुणाचा निर्घृणपणे चाकू भोकसून करण्यात आलेला खून, जालना किंग गजानन तौर हत्याकांडातील मुख्य आरोपींना अटक करण्याचं आवाहन त्यांच्यापुढे होते या आरोपींना त्यांनी २४ तासात अटक करत आपली कामगिरी बजावली होती. खनाळ यांनी यावेळी १३ महिन्याच्या कालावधीतील बरेच अनुभव सांगत जालना येथून स्थानिक गुन्हे शाखेतून बदली झाल्याची माहिती दिली आहे. स्थानिक गुन्हे शाखेचे मावळते पोलीस निरीक्षक रामेश्वर खनाळ यांनी आपला पदभार जाधव यांच्याकडे सुपूर्द करत त्यांना पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

## श्री गजानन महाराज दिंडी मंगळवारी अंबड मध्ये दिंडीनिमित्त अवजड वाहनाचा मार्गात बदल

**जालना । प्रतिनिधी**

श्री गजानन महाराज संस्थान शेगाव या न्यासाची श्री ची पालखी पायदळवारी पालखी पंरपरेनुसार पंढरपुर येथुन परतीच्या मार्गावर आहे. या दिंडीमध्ये ७००-८०० वारकरी सहभागी आहेत. सदर पायी दिंडी ही दि. ३० जुलै २०२४ रोजी जालना जिल्ह्यात प्रवेश करणार असून दि. ३० जुलै ते १ ऑगस्ट २०२४ पर्यंत गोंदी व अंबड हद्दीत मुक्कामी राहुन दि. १ ऑगस्ट रोजी गोलापांगरी मार्गे जालना शहराकडे प्रयाण करणार आहे. दिंडीचे दर्शन घेण्याकरिता मोठ्या प्रमाणात भाविकांची गर्दी होणार असुन अवजड वाहनांच्या रहदारीमुळे विवादीत परिस्थिती निर्माण होवुन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. पायी दिंडीतील भाविकांच्या व जनतेच्या सुरक्षीततेसाठी व वाहतुकीच्या सुनियमनासाठी सदर मार्गावरील अवजड वाहनांना पर्यायी मार्गाने वळविण्यात आले आहे, असे आदेश पोलिस अधिक्षक अजयकुमार बन्सल यांनी जारी केले आहे.

मंगळवार दि. ३० जुलै २०२४ रोजी सकाळी ८ वाजेपासुन ते रात्री ११ वाजेपावेतो हरीओम हॉटेल वडीगोद्री समोरील उडडानपुलाचे खालुन व बाजुने अंबडकडे येणारी अवजड वाहने थांबवुन, सदर वाहने पाचोड- अंबड मार्गे जालनाकडे जातील व जालनाकडुन शहागडकडे जाणारी वाहने अंबड- पाचोडमार्गे शहागडकडे जातील. बुधवार दि. ३१ जुलै २०२४ रोजी सकाळी ३ वाजेपासुन ते रात्री ११ वाजेपर्यंत हरीओम हॉटेल वडीगोद्री समोरी उडडानपुलाचे खालुन व बाजुने अंबडकडे येणारी सर्व अवजड वाहने थांबवुन, पाचोड- जामखेड फाटा- जामखेड- किनगाव चौफुली- बदनापुर मार्गे जालनाकडे जातील. तसेच जालनाकडून येणारी वाहने बदनापुर- किनगाव चौफली- पाचोड मार्गे शहागडकडे जातील. तसेच शहापुर ते शहागड व अंबड ते पाचोड मार्गावरील गावातील अवजड वाहनांनी वरील पर्यायी मार्गाचा वापर करावा. तसेच पारनेर फाटा ते छत्रपती संभाजीनगर महामार्गापर्यंतच्या गावातील अवजड वाहनांनी या पर्यायी मार्गाचा वापर करावा. गुरुवार दि. १ ऑगस्ट २०२४ रोजी सकाळी ३ वाजेपासुन ते रात्री ११ वाजेपर्यंत हरीओम हॉटेल वडीगोद्री समोरील उडडानपुलाचे खालुन व बाजुने अंबडकडे येणारी सर्व अवजड वाहनांना प्रवेश बंद करुन, सदर वाहने वडीगोद्री- पाचोड- जामखेड फाटा- जामखेड- किनगाव चौफुली बदनापुर मार्गे जालनाकडे जातील. तसेच जालनाकडुन येणारी वाहने बदनापुर- किनगाव चौफुली जामखेड जामखेड फाटा- पाचोड मार्गे शहागडकडे जातील. तसेच अंबडकडून जालनाकडे जाणारी अवजड वाहने सकाळी ३ ते रात्री ११ वाजेदरम्यान बंद करुन सदर वाहने किनगाव चौफुली- बदनापुर मार्गे जालनाकडे जातील व जालनाकडून अंबडकडे येणारी अवजड वाहने बदनापुर- किनगाव चौफुली- जामखेड- पाचोड मार्गे शहागडकडे जातील. याप्रमाणे वाहतुकीच्या मार्गात बदल करण्यात आला आहे. असेही आदेशात नमुद करण्यात आले आहे.

# कोल्हापूरसाठी दोन दिवस महत्त्वाचे !

## हवामान विभागाकडून सतर्कतेचा इशारा

**कोल्हापूर । वृत्तसंस्था**

**कोल्हापूरला महापूराचा धोका कायम आहे. शहरातील अनेक भागात पाणी शिरले आहे. शनिवारी (दि.२७) दुपारी ३ वाजता पंचगंगा नदीची राजाराम बंधाऱ्याजवळ पाणी पातळी ४७ फूट ६ इंचावर गेली. दरम्यान, हवामान विभागाच्या अंदाजानुसार, कोल्हापूरसाठी दोन दिवस महत्त्वाचे आहेत. कारण हवामान विभागाने कोल्हापूर जिल्ह्यासाठी रविवारी (२८जुलै) जोरदार पावसाचा यलो अलर्ट दिला आहे. त्यानंतर कोल्हापूर जिल्ह्यात पावसाचा जोर कमी होऊन तो हलका ते मध्यम स्वरुपाचा राहील, असे हवामान विभागाने म्हटले आहे.**



कोल्हापुरात पुराचे पाणी शिरल्याने महापुराची धास्ती वाढली आहे. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शनिवारी (दि.२७) कोल्हापुरातील आपत्तीग्रस्तांना तातडीने मदत उपलब्ध करुन देण्याच्या सूचना प्रशासनाला केल्या आहेत. मुख्यमंत्री शिंदे यांनी दिल्लीत निती आयोगाच्या बैठकीला जाण्यापूर्वी कोल्हापूर जिल्हाधिकारी अमोल येडगे यांच्याशी चर्चा केली. कोल्हापूर जिल्ह्यातील पूरपरिस्थिती, अतिवृष्टी, मदत आणि बचाव कार्याची मुख्यमंत्र्यांनी माहिती घेऊन आपत्तीग्रस्तांना तातडीने मदत उपलब्ध करुन देण्याच्या सूचना दिल्या. कोल्हापुरात बचावकार्यासाठी आवश्यकता भासल्यास एनडीआरएफ, एसडीआरएफच्या तुकड्या पाठविण्यात याव्यात. प्रसंगी सैन्यदलाची मदत घेण्यात यावी. त्याचबरोबर अलमट्टी धरणातील पाण्याच्या विसर्गाबाबत कर्नाटक प्रशासनाशी समन्वय ठेवून नियोजन करावे, अशा सूचनाही मुख्यमंत्री शिंदे यांनी केल्या आहेत.

कोल्हापूरसह पुणे, सातारा (आज आणि उद्या), भंडारा, चंद्रपूर, गोंदिया या जिल्ह्यांसाठी ऑरेंज अलर्ट दिला आहे. रायगडसाठी रविवारी ऑरेंज अलर्ट राहील. तसेच पालघर, ठाणे, मुंबई, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पुणे, कोल्हापूर, अकोला, अमरावती, नागपूर, विदर्भ येथे यलो अलर्ट दिला आहे. गेल्या २४ तासांत मध्य महाराष्ट्रातील महाबळेश्वर (सातारा), चंदगड, शाहुवाडी, राधानगरी (कोल्हापूर), वेल्हे (पुणे) येथे मुसळधार पावसाची नोंद झाली आहे.

# महाराष्ट्र संपन्न राज्य ; योजनेला पैशाची अडचण येणार नाही!

**मुंबई । प्रतिनिधी**

**आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्याच्या अर्थसंकल्पात राज्याचे अर्थमंत्री अजित पवार यांनी महिलांसाठी 'मुख्यमंत्री लाडकी बहीण योजने'ची घोषणा केली. २१ ते ६५ वयोगटातील अडिच लाख रुपयांपर्यंत वार्षिक उत्पन्न असणाऱ्या कुटुंबातील महिलेला दर महिन्याला १५०० रुपयांचे मानधन देणारी ही योजना आहे.**

### लाडकी बहीण योजनेबाबत अजित पवारांचा मोठा खुलासा, पैसे नसल्याची बातमी खोटी असल्याचा दावा

या महत्वकांक्षी योजनेवर राज्य सरकारकडून मोठा खर्च केला जाणार आहे. यामुळे सहाजिकच राज्याच्या तिजोरीवर याचा अतिरिक्त ताण येणार आहे. दरम्यान या योजनेला वित्त विभागाचा विरोध असल्याच्या बातम्या समोर आल्या होत्या. यानंतर आता राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी स्वतः याबद्दलची भूमिका स्पष्ट केली आहे. अजित पवार यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर याबद्दल मोठी पोस्ट लिहीली असून महाराष्ट्रासारख्या आर्थिक संपन्न राज्याला या योजनेसाठी आवश्यक रक्कम खर्च करणे शक्य असल्याचे अजित पवार म्हणाले.



याबाबत अजित पवार यांनी म्हटले आहे की, महाराष्ट्राचा उपमुख्यमंत्री आणि राज्याचा अर्थ व नियोजन मंत्री म्हणून मी स्वतःच मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना राज्याच्या वर्ष २०२४-२५ च्या अतिरिक्त अर्थसंकल्पात सादर केली आहे. वित्त व नियोजन, सर्व संबंधित विभाग तसेच राज्य मंत्रिमंडळाच्या मान्यतेनंतरच या योजनेची घोषणा मी राज्याच्या अर्थसंकल्पात केली. चालू आर्थिक वर्षात योजनेसाठी आवश्यक एकूण ३५ हजार कोटी रुपयांच्या संपूर्ण रकमेची तरतूद यावर्षीच्याच अर्थसंकल्पात केली आहे. त्यामुळे या योजनेसाठी पैसा कुठून आणणार, हा प्रश्नच उद्भवत नाही. महाराष्ट्रासारख्या आर्थिक संपन्न राज्याला एवढी रक्कम खर्च करणे शक्य आहे. राज्यातील माता-भगिनी-मुलींच्या आर्थिक स्वातंत्र्य, स्वावलंबन, पोषण व सर्वांगीण सक्षमीकरणासाठी, मान, सन्मान, स्वाभिमान वाढवण्यासाठी ही रक्कम खर्च करण्याची राज्य शासनाची तयारी आहे. त्यामुळे मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेला या राज्यातील कुणाचाही विरोध असण्याचे कारण नाही, असूच शकत नाही, असे ते म्हणाले. अजित पवार पुढे म्हणाले की, ''काही प्रसार माध्यमांमध्ये प्रसिद्ध झालेल्या, या योजनेला वित्त विभागाचा विरोध असल्याच्या बातम्या कपोलकल्पित, वस्तुस्थितीशी, विसंगत, राजकीय हेतूने प्रेरित आहेत. प्रसार माध्यमांनी अशा बिनबुडाच्या बातम्या देणे कृपया थांबवावे. राज्यातील कुणाचाही अशा बातम्यांवर विश्वास बसणार नाही, याची मला खात्री आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या यशस्वीतेसाठी अधिकाधिक भगिनींना यात सहभागी करून घेण्यासाठी आपण सर्वांनी प्रयत्न करूया असे आवाहन त्यांनी केले.

## पान १वरून...

### केंद्र सरकारचा शेतीचा

त्याची चर्चा सातत्याने होत होती. प्रत्येक विभागाच्या मंत्र्यांनीही बैठका घेऊन याची जोरदार तयारी करत असल्याची प्रसिध्दी केली होती. कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी कृषी मंत्रालयात पहीली बैठक घेऊन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सुचननेनुसार कृषी मंत्रालयाचा १०० दिवसांच्या ॲक्शन प्लॅन तयार असल्याचे सांगितले होते. कृषी विभागाच्या प्लॅनमध्ये पिकांची उत्पादकता वाढविणे, उत्पादन वाढविणे आणि गुणवत्ता वाढविणे तसेच डिजिटल कृषी मिशन राबविण्याचा समावेश असल्याचे कृषिमंत्र्यांनी सांगितले होते. कृषिमंत्र्यांनी पहिला महिना या ॲक्शन प्लॅनच्या प्रसिध्दीमध्ये घालवला. पण अद्याप पुढे काहीच झालेले नाही. भाजपला ग्रामिण भागात लोकसभा निवडणुकीत फटका बसला होता. शेतीविरोधी धोरणामुळे शेतकरी नाराज होते. याची दखल काही नेत्यांनीही घेतली होती. त्यामुळे सरकार खरेच आता शेती आणि शेतकऱ्यांना गांभीर्याने घेऊन समस्या सोडविण्यासाठी काम करेल आणि त्याचाच एक भाग म्हणजे पहिल्या १०० दिवसांचा अजेंडा आहे, असे चर्चा सगळीकडे सुरु होती. सगळेजण मोदी शेतकऱ्यांना काय सरप्राईज देणार याची वाट पाहत होते. पण वाट पाहता पाहता दिड महिना होऊन गेला. मात्र मोदींचे सरप्राईज अजून आले नाही.

----------

### दिल्लीत उद्या महिला

या अर्थसंकल्पात केंद्र सरकारने जनगणनेसाठी कोणतीही तरतूद केली नाही. या आरक्षणाची तात्काळ अंमलबजावणी केली पाहिजे तसेच या आरक्षणात एससी, एसटी, ओबीसी घटकांच्या महिलांनाही आरक्षणाचा लाभ मिळाला पाहिजे. महागाई प्रचंड वाढलेली असून गृहिणींना महागाईमुळे घर चालवणे कठीण झाले आहे, भाजपा सरकारने महागाईवर नियंत्रण आणून दिलासा द्यावा. महिलांवर देशभर अत्याचार वाढले आहेत, त्याला प्रतिबंध घालण्यासाठी कडक उपाययोजना करावी, महिलांवर अत्याचार करणाऱ्यांना कठोर शिक्षा झाली पाहिजे, या महिला काँग्रेसच्या मागण्या आहेत, असल्याचे सांगितले.

-----------

### 'ओबीसींचे १०० आमदा

पण कुठलीही पार्टी आरक्षण वाचवण्याच्या बाजूने आहे की नाही हे पाहणार आहे. ओबीसींचे किमान १०० उमेदवार निवडून आणणार का? हे पाहावे लागेल. सगेसोयरे कायदा आणायचा यांनी ठरवले तर छगन भुजबळ थांबवू शकत नाहीत. कारण आपले संख्याबळ नाही. त्यामुळे हे सर्व पक्ष ओबीसींच्या विरोधात आहेत. येणाऱ्या निवडणुकीत पक्ष बघू नका, स्वत:कडे बघा, आरक्षण वाचवणाऱ्याकडे बघा', असे आवाहन प्रकाश आंबेडकर यांनी केले.

--------

### लोकसभेप्रमाणे विधानसभेलाही

माझी लाडकी बहीण योजनेबाबत बोलताना ते म्हणाले, डॉन चित्रपटात अमिताभ बच्चन यांना पोलिसांनी घेरलेले असते. त्यावेळी त्याची हिरोईन म्हणाते, आपल्याकडील बंदुकीत गोळी नाही, मग येथून निघणार कसे. त्यावर तो म्हणतो, गोळी नाही, हे तुला आणि मलाच माहित आहे, पोलिसांना कुठे महिती आहे. असे सांगून गोळी नसलेली बंदूक दाखवून तो तेथून निघून जातो. तसाच प्रकार सध्या राज्य सरकार करीत आहे. तिजोरी रिकामी असताना जनतेला ती भरलेली असल्याचे भासवत आहेत. लाडकी बहिण योजना ही निवडणुक डोळ्यासमोर ठेवून सुरु केलेली योजना असून ती नंतर बंदही करतील, असे ते म्हणाले. बीड जिल्ह्यातील विधानसभा निवडणुकीबाबत बोलताना पाटील म्हणाले, आमच्याकडे इच्छुकांची खूप गर्दी आहे, त्यामुळे उमेदवार देताना आम्ही घाई करणार नाहीत, चांगला उमेदवार देऊन सर्वच मतदार संघात आम्ही विजयी होऊ असे ते म्हणाले. यावेळी पत्रकार परिषदेला खा. बजरंग सोनवणे, आ. संदिप क्षीरसागर, महेबुब शेख, माजी आ. सय्यद सलिम, माजी आ. उषाताई दराडे, डॉ. नरेंद्र काळे, ईश्वर मुंडे आदि उपस्थित होते.

-----------

### बीड जिल्ह्याचा पाणी प्रश्न हाती घेऊन

बीड जिल्ह्यातील घराघरात घेऊन जाण्यासाठी आपल्याला कटीबद्ध व्हावे लागेल, असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी केले. ते निष्ठावंत कार्यकर्ता संवाद मेळाव्यात बोलत होते. या कार्यक्रमास खा. बजरंग सोनवणे, आ. संदिप क्षीरसागर, डॉ. नरेंद्र काळे, शेख महेबुब, ईश्वर मुंडे आदि उपस्थित होते. बीड जिल्ह्यातील सहा विधानसभा मतदारसंघातील पक्षाच्या निष्ठावंत कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने या मेळाव्याला उपस्थिती होती. प्रांताध्यक्ष जयंत पाटील यांनी कार्यक्रम प्रसंगी कार्यकर्त्यांशी संवाद साधत यावेळी ते म्हणाले, बीड जिल्ह्यातील अनेक प्रश्नांवर आपल्या पक्षाने काम केले आहे. शेती आणि पाण्याचे प्रश्नही आपले सरकार आल्यावर आपण निश्चितपणे सोडवणार आहोत. यापूर्वीच जिल्ह्यासाठी विकासाचे धोरण आम्ही आखले होते, परंतु दुर्दैवाने आमचे सरकार गेले. मात्र बीड जिल्ह्यातील पाणी प्रश्न विशेषत: हातात घेऊन तडीला लावण्याचा संकल्प हाती घेऊन आपण काम करूया. शेतकरी-कष्टकऱ्यांपर्यंत, सर्वसामान्यांपर्यंत पोहोचून, आपल्याला जनतेची कामे करावी लागतील. बीड जिल्ह्यातील राष्ट्रवादीचा प्रत्येक कार्यकर्ता हे काम इमानेइतबारे करत आहे. त्यामुळे पक्षाला विक्रमी विजय मिळणारच आहे, मात्र आता पक्षाची ध्येयधोरणे, पक्ष विचार बीड जिल्ह्यातील घराघरात घेऊन जाण्यासाठी आपल्याला कटीबद्ध व्हावे लागेल, असे आवाहन यावेळी बोलताना केले. यावेळी खा. बजरंग सोनवणे यांनी देखील पक्षाचे प्रमुख नेते, उपस्थित कार्यकर्त्यांशी संवाद साधला. ते म्हणाले, जयंत पाटील साहेबांना बीड जिल्ह्यातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष मजबुतीने काम करत असल्याची ग्वाही दिली. येत्या विधानसभा निवडणुकांमध्ये जिल्ह्यातील सहाही विधानसभेत राष्ट्रवादीचा झेंडा रोवण्याचे आवाहन याप्रसंगी पक्ष पदाधिकारी, कार्यकर्त्यांना केले. यावेळी आ. संदिप क्षीरसागर, माजी आ. सय्यद सलीम, शेख महेबुब यांनी कार्यकर्त्यांशी संवाद साधला. कार्यक्रमास मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.

----------

### निति आयोगाच्या

ममता बॅनर्जी यांनी बोलण्याची परवानगी दिली नसल्याचे सांगत केंद्र सरकारवर आरोप केला. त्यामुळेच आपण बैठकीतून बाहेर पडल्याचे त्यांनी सांगितले. ममता बॅनर्जी म्हणाल्या की, मी बैठकीवर बहिष्कार टाकून बाहेर आले आहे. आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांना बोलण्यासाठी २० मिनिटे देण्यात आली. आसाम, गोवा, छत्तीसगडच्या मुख्यमंत्र्यांनी १०-१२ मिनिटे बोलले. अवघ्या पाच मिनिटांनी मला बोलण्यापासून थांबवण्यात आले. हे अन्यायकारक आहे. विरोधी पक्षाकडून इथे मी एकटीच होते. मी बैठकीला उपस्थित राहिले कारण सहकारी संघराज्य बळकट केले पाहिजे, या भूमिकेतून उपस्थित राहिल्याचे त्यांनी सांगितले. ममता बॅनर्जी पुढे म्हणाल्या की, बजेट हे राजकीय, पक्षपाती अर्थसंकल्प आहे. मी म्हणाले, तुम्ही इतर राज्यांशी भेदभाव का करता? नीती आयोगाकडे आर्थिक अधिकार नाहीत, ते कसे चालेल? याला आर्थिक अधिकार द्या किंवा नियोजन आयोगाला परत आणा, अशी मागणीही आपण केल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

---------------

### आरक्षणाला धक्का लागल्यास

आजचा नाही, तो फार जुना आहे. वर्षानुवर्षी या समाजाकडून आरक्षणाची मागणी होत आलेली आहे. ज्यांच्याकडून आता मागणी जोर धरू लागली आहे. त्या समाजाचे खंबीर नेतृत्व अनेक वेळा महाराष्ट्रात राहिलेले आहेत. किंबहुना अनेक पक्षात राहिलेले आहेत. त्यांनी आजपर्यंत आरक्षण नाही दिले. पण आज आरक्षणाच्या मुद्द्यावर फक्त टीका करायची. कारण ते स्वतः देऊ शकले नाही, मात्र आता चुका काढत बसायचे. आता निवडणुकीच्या काळामध्ये विरोध करायचा, हा एकच मुद्दा बनल्याची टीका राष्ट्रवादीचे नेते प्रफुल्ल पटेल यांनी आरक्षणाच्या मुद्द्यावर विरोधकांवर केली.

--------

### तो दिवा महाराष्ट्राच्या

आधीच का जाहीर केली गेली नाही, अशी चर्चा लोकांमध्ये असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच अजित पवार गटासोबत गेलेले विधान परिषदेचे आमदार बाबाजानी दुर्रानी हे पुन्हा स्वगृही परतत असल्याबाबत विचारले असता शरद पवार म्हणाले की, ज्यांची भावना बदलेली आहे आणि मूळ पक्षाच्या विचाराशी बांधिलकी मानत कोणी परत येत असेल तर त्याचे स्वागतच करू. मात्र काही लोकांनी टोकाची भूमिका घेत पक्ष सोडला त्याबाबत विचार करावा लागेल. याबाबत आमच्या पक्षाच्या नेत्यांमध्ये चर्चा करून पुढील निर्णय घेणार असल्याचे यावेळी त्यांनी सांगितले.

-----------

cmyk

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
रविवार दि. २८ जुलै २०२४


## सर्वसामान्यांशी नाळ जोडलेल्या देवदूत ओमप्रकाश शेटे यांना उमेदवारी द्यावी-गंगाधर गडदे

**बीड । प्रतिनिधी**



आयुष्यमान भारत , मिशन महाराष्ट्र समिती चे अध्यक्ष डॉ ओमप्रकाश शेटे साहेब यांना माजलगाव मतदार संघात भारतीय जनता पक्षांने उमेदवारी द्यावी , महात्मा जोतिराव फुले व आयुमान भारत च्या माध्यमातून डॉ ओमप्रकाश शेटे साहेब यांनी अनेक रुग्णाचे जीव वाचवत आहेत. देवदूत डॉ ओमप्रकाश शेटे साहेब हे नेहमीच सर्वसामान्यांच्या सुख;दुखात सहभागी असतात. सर्वसामान्य शी नाळ जोडलेला माणूस म्हणून देवदूत डॉ ओमप्रकाश शेटे साहेब यांची ओळख आहे. रूग्णसेवेने माजलगाव मतदार संघात घराघरात पोहचलेले डॉ ओमप्रकाश शेटे याना उमेदवारी देण्यात यावी ही कार्यकर्ते व माजलगाव मतदार संघातील लोकांची इच्छा आहे , व डॉ ओमप्रकाश शेटे यांच्या रूपाने माजलगाव करानां एक माणसाच्या रूपाने देव मिळेल तसाच माजलगाव मतदार संघात विकासाला तोड राहणार नाही, माजलगावचे भूमिपुत्र आणि महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेब यांचे सच्चे , निष्ठावंत म्हणून समजले जाणारे डॉ ओमप्रकाश शेटे साहेब यांच्या रूपाने माजलगाव मतदार संघाला वेगळीच चाहूल निर्माण झाली आहे, भारतीय जनता पक्षाने माजलगाव मतदार संघात डॉ ओमप्रकाश शेटे साहेब यांनाच उमेदवारी द्यावी अशी मागणी गंगाधर गडदे यांनी केली आहे.

# तलवाडा ग्रामपंचायत भ्रष्टाचाराचे आगार

## ग्रामपंचायत अंतर्गत झालेल्या एमआरजीएस (नरेगा) घोटाळ्याची उच्चस्तरीय चौकशी करून कारवाई करण्यात यावी

### आरपीआयच्या वतीने सुमेध करडे, विनोद आठवले उपोषणास बसणार

### जिल्हाधिकारी यांना निवेदन दिले

तलवाडा । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील तलवाडा ग्रामपंचायत अंतर्गत एमआरजीएस( नरेगा ) चा बोगस कागदपत्रे मास्टर तयार करून शासनाच्या लाखो रुपयाचा अपहार केल्यामुळे पाच ऑगस्टपर्यंत तात्काळ समिती स्थापन करून उच्चस्तरीय चौकशी करून सरपंच,ग्रामसेवक, संबंधित अभियंता , ग्राम रोजगार सेवक व संबंधित अधिकारी यांचेवर तात्काळ नियमानुसार कारवाई करण्यात यावी ,अन्यथा दि. पाच ऑगस्ट, २०२४ तलवाडा ग्रामपंचायत समोर आरपीआयच्या वतीने तलवाडा युवा सर्कल प्रमुख सुमेध करडे, तसेच सर्कल प्रमुख विनोद आठवले हे आमरण उपोषणास बसणार आहेत असे निवेदन जिल्हाधिकारी कार्यालयात दाखल करण्यात आले आहे

जिल्हाधिकारी साहेब यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, सरपंच, ग्रामपंचायत तलवाडा ,ग्रामसेवक, ग्रामरोजगर सेवक संबंधित पंचायत समिती , गेवराई मधे कार्यरत अधिकारी व अभियंता यांनी संगनमत करून तलवाडा ग्रामपंचायत कार्यक्षेत्रात रोजगार हमी योजनेअंतर्गत व इतर कामात प्रचंड अनियमितता व केलेली आहे. तसेच कित्येक कामे फक्त कागदोपत्री दाखवून खूप मोठा भ्रष्टाचार केलेला आहे. १ ) मोहगणी वृक्ष लागवड , तुती लागवड : -मोहगणी वृक्ष लागवड व तुती ची प्रत्येक्षात लागवड न करता ,लागवड कागदोपत्री दाखवून संगणमताने भ्रष्टाचार केलेला आहे. कांही प्रकरणात मयत व्यक्तींच्या नावे मोहगणी वृक्ष लागवड दाखवून शासन निधीचा अपहार केलेला आहे . २ ) *जल सिंचन विही :-सरपंच व ग्रामसेवक यांनी संगणमताने कांही




प्रकरणात विहिरीचे संपूर्ण काम न करता कुशल व अकुल बील उचलून शासकीय निधीचा खूप मोठा भ्रष्टाचार केलेला आहे. ३) मनरेगा अंतर्गत पांदण रस्ते व सिमेंट रस्ते मनरेगा अंतर्गत पांदण रस्त्याची कामे अत्यंत निकृष्ठ दर्जाची झाली आहेत . उदाहरणार्थ, गावची पूर्वेकडील वेस ते खटकली रस्ता १ ज्ञा . ळळ ) सिमेंट रस्ता :- र) गणपती मंदीर देवीच्या पायथ्यापासून ते गोविंदवाडी रोड . जुन्या, अस्तित्वात असलेल्या खडी व मुरूम युक्त रस्त्यावर सिमेंट काँक्रिट वाळूचा थर , साधारण २ ते ३ इंच थर देऊन गेवराई-- तलवाडा - माजलगाव राज्य महामार्ग येतपर्यंतच केला . ( अंदाजे ३०० ते ३५० मीटर ). गोविंदवाडी रोड पर्यंत काम केलेच नाही . सदरील कामाचे बील ठी २७,००,०००/- ( सत्तावीस लक्ष )उचलले .ळळळ) सिमेंट रस्ता :- ऑनलाइन रस्त्याचे लोकेशन दाखवले नाही . सिमेंट रस्ता व पेव्हर ब्लॉक बसवणे या कामासाठी ठी ८,०३,०००/- उचलले . मनरेगा अंतर्गत असा गावात रस्ताच झाला नाही .

४) दलित वस्ती विकास :- ( २०२३- २४) ळ) चांभार वस्ती, ढोर समाज वस्ती व मातंग वस्ती येथे पूर्वीच सिमेंट रस्ता अस्तित्वात होता . याचं रोडवर पेव्हर ब्लॉक बसवून, ठी. १४,००,०००/- रू खर्च दाखवून प्रचंड शासन निधीचा अपहार केला. ळळ) मातंग वस्ती तलवाडा येथे ठी ७,००,०००/- (सात लक्ष ) चे निकृष्ठ दर्जाचे हाय मास्ट दिवे बसवले ( भारतीय बनावटीचे ऐवजी चायना बनावटीचे असावेत ) . हा दलित समाजावर आर्थिक अन्याय आहे.

२०२४- २५:- दलित वस्ती विकास निधी ठी ६०,००,०००/- प्राप्त . नवीन गणेश नगर व नवीन मातंग वस्ती अस्तित्वात नाही, पण यासाठी फंड प्राप्त. चुकीची माहिती सादर करून फंड प्राप्त व अनियमित खर्च . याचीही सखोल चौकशी झालीच पाहिजे

५) पाणी पुरवठा:- पाणी- पुरवठा करीता १५ वा वित्त आयोग निधी, विशेष घटक योजनेमधून, न .झ , व सामान्य निधी मधून ५० ते ५५ लक्ष खर्च केले . याची सर्वकस चौकशी करावी कारण विशेष घटक योजने अंतर्गत ९ लक्ष रू उचलून फक्त दोन ते तअडीच लक्ष खर्च करून तलावात विहीर खोदली पण अंबिका नगरसाठी योजना पूर्ण न करता शासन निधीचा अपहार केला .

६); पंधरावा वित्त अयोगातून खर्च:- पंधराव्या वित्त अयोगातून झालेले सर्व सिमेंट रस्ते , ड्रेनेज, अंडर ग्राउंड नाली, स्मशान भूमी इत्यादींची कामे अत्यंत निकृष्ठ दर्जाची झाली आहेत. या कामात प्रचंड अनियमितता व भ्रष्टाचार झाला आहे. *

७) तांडा वस्ती विकास कामे:-

राजुरी मळा तांडा ठी २०,००,०००/- ( वीस लाख ) . देवितांडा ठी २०,००,०००/- (वीस लाख )एस्टीमेट / टेंडर नोटीस प्रमाणे काम नाही केले, खडी नाही, कपचा नाही दाबाई नाही , फक्त मुरूम दाबाई करून व सिमेंट वाळूचा मिक्स करून थर अडीच तीन इंच वटाकला . व रोड तयार केला. प्रचंड भ्रष्टाचार.

यापूर्वी कित्येकदा काही वृत्तपत्र दैनिकांनी तलवाडा ग्रामपंचायतच्या भ्रष्टाचाराविषयी वृत्तपत्रातून आवाज उठवला होता. परंतु कुठल्याही प्रकारची चौकशी वा कारवाई झालेली नाही.सर्व प्रकरणे तडजोडीने मिटवली गेली किंवा दडपवून टाकली गेली असावी अशी आमची धारणा आहे.

करीता एकंदरीत विनंती अशी आहे की तलवाडा ग्रामपंचायत ने केलेल्या सर्वच कामांची यथायोग्य उच्चस्तरीय अधिकाऱ्यांच्या मार्फत निपक्षपातीपणे चौकशी करुन दोषी अधिकारी ,कर्मचारी, इंजिनीयर , ग्रामसेवक व सरपंच त्यांचे विरुद्ध तात्काळ गुन्हे दाखल करण्यात येऊन कठोर कारवाई करण्यात यावी. हीच नम्र विनंती आहे . जोपर्यंत गुन्हे दाखल होत नाहीत होत नाहीत तोपर्यंत हे अमरण उपोषण सुरूच राहणार आहे.

## विशाळगड प्रकरण: हल्ल्याचा प्रा. टी. पी.मुंडे यांच्याकडून जाहीर निषेध!

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

**सातारा जिल्ह्यातील गजापूर या गावी अतिक्रमण हटाव मोहिमेच्या नावाखाली विशाळगडाच्या अवघ्या ३ किमी अंतरावर असलेल्या धार्मिक स्थळावर (मस्जिद) आणि मुस्लिम समुदायाच्या लोकांवर केलेल्या समाजकंटकाच्या भ्याड हल्ल्याचा ओबीसी बहुजन पार्टीचे राष्ट्रीय उपाध्यक्ष तथा महाराष्ट्राचे ओबीसी नेते प्रा.टी.पी.मुंडे सरांनी या घटनेचा जाहीर निषेध व्यक्त केला आहे तसेच अल्पसंख्यांक समाजावर अन्याय व हल्ल्याचे प्रमाण वाढल्यामुळे शासनाने प्रत्येक जिल्ह्यासाठी पोलिसांमार्फत अल्पसंख्याक समाजासाठी समिती नेमावी अशी मागणी ही त्यांनी केली आहे.**



मुस्लिम समुदायावर अशा प्रकारचे भ्याड हल्ले होणे अतिशय दुर्दैवी बाब आहे. पुरोगामी महाराष्ट्रात अल्पसंख्यांक समाजावर हल्ल्याचे प्रमाण वाढले आहे. विशाळगडापासून अवघ्या ३ किमी अंतरावर वसलेले गजापूर या गावी मुस्लिम समाजाच्या घरांवर हल्ले झाले. त्यात पुरुषासह महिला जखमी झाल्या. पोलीस प्रशासनाने मात्र तेथे बघ्याची भूमिका घेतली. या हल्ल्याच्या पाठीमागे कोणाचा हात आहे हे मात्र अजून पोलीस प्रशासनाला कळले नाही की मुद्दाम होऊन त्यांना पाठीशी घातले जात आहे असा सवाल त्यांनी उपस्थित केला. छत्रपती शिवाजी महाराजांनी नेहमीच मुस्लिम समाजाचा आदर केला आहे. त्यांच्या अष्टप्रधान मंडळात मुस्लिम समाजाचाही समावेश होता त्यामुळे समाजा समाजात धार्मिक व जातीय तेढ निर्माण करण्याचा काही समाजकंटकांचा उद्देश आहे मात्र त्यामध्ये ते यशस्वी होणार नाहीत. या भ्याड हल्ल्याचा त्यांनी जाहीर निषेध व्यक्त केला आहे.

# शेतकऱ्यांच्या पिकविम्याचे पैसे तत्काळ खात्यात जमा-घाडगे

**घनसावंगी । प्रतिनिधी**

निसर्गाच्या लहरीपणामुळे घनसावंगी मतदारसंघातील शेतकऱ्यांच्या शेती पिकाचे आणि फळबागांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होऊन सुद्धा पिक विमा योजनेचे संरक्षण कवच घेऊन देखील पिक विमा कंपनीने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना भरपाईची रक्कम दिली नाही. गुंज येथील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या पीक विम्याबाबत आज श्री सतीश घाटगे यांनी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी गहिनीनाथ कापसे यांना जाब विचारला व तात्काळ शेतकऱ्याचे पीक विम्याचे पैसे खात्यामध्ये जमा करण्याचे विमा कंपनीला आदेश देण्यात यावे व पैसे जमा ना केल्यास पिक विमा कंपनीवर गुन्हा दाखल करण्याचे आदेश देण्यात यावे. शेतकऱ्यांच्या अडचणी त्यांच्यासमोर मांडल्या. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने पीक विम्याची रक्कम मिळवून देण्यासाठी पिक विमा कंपनीला आदेश देऊन तातडीने शेतकऱ्यांच्या खात्यात नुकसान भरपाईची रक्कम जमा करण्याची मागणी केली. विमा लवकर न मिळाल्यास विमा कंपनीवर गुन्हे दाखल करण्याचा इशारा श्री सतीश घाटगे यांनी दिला आहे.



### पैसे जमा ना केल्यास कंपनीवर गुन्हा दाखल करण्याचा इशारा

# अखेर रोहन गलांडे पाटील यांच्या उपोषनाला आले यश

## पत्रकार, सरपंच,माजी आमदार, प्रशासनाने सोडले उपोषण

**केज । प्रतीनिधी**

केज तालुक्यातील चिंचोली माळी येथील श्री संत नामदेव महाराज तीर्थक्षेत्र विकास कामाला काम सुरू करण्यासाठीची तीर्थक्षेत्राचे काम प्रत्यक्ष कामाला सुरुवात केली जात नाही तोपर्यंत आमरण उपोषणाला बसले होते तरी उपोषणाच्या तीसऱ्या दीवशी सार्वजनिक बांधकाम केज यांनी प्रत्यक्षात कामाला सुरुवात केली व मागण्या तीर्थक्षेत्राचे काम सुरू केल्यानंतर पुर्ण करण्यासाठी पाच मागणी मान्य,काम सुरू केल्यानंतर बंद करण्यात येणार नाही मागणी मान्य,तीर्थक्षेत्रांच्या कामासाठी लागणारी पुर्ण सामग्री कार्यक्षेत्रात उपलब्ध कधी तर उपलब्ध केली आहे मागणी मान्य ,तीर्थक्षेत्र तात्काळ कामाला स्वता गुत्तेदार , बांधकाम विभागाचे अधिकारी, गावकरी यांच्या हस्ते नारळ फोडुन करण्यात यावे मागणी मान्य.काम बंद केले तर याला जबाबदार कार्यकारी अभियंता युवराज मळीकर आहे

वरील प्रमाणे विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे व मागण्या मान्य करुन व इतर मागण्या व मागिल उपोषणातील मागण्या मान्य करून प्रत्यक्ष कामाला सुरुवात केली आहे व रोहन गलांडे पाटील यांनी उपोषणाला काम पुर्ण होईपर्यंत स्थगिती दिली यावेळी उपस्थित माजी आमदार पृथ्वीराज साठे, जेष्ठ नेते सुरेश तात्या पाटील, माजी सरपंच सुनील बापु देशमुख, मंडळ अधिकारी मस्के साहेब,तलाठी क्षीरसागर साहेब,जेष्ठ पत्रकार रामदासजी तपसे, ग्रामपंचायत सदस्य बालाजी राऊत, युवराज मगर सर, शिवाजी आबा गायकवाड,जेष्ठ शिवसैनिक लक्षीमन तात्या गलांडे, दत्ता पाटील गलांडे,अभियंता अतुल मुंडे, गुत्तेदार चंदनशिव, अशोकराव देशमुख, मुन्ना नखाते, भैरवनाथ हुंबे, जालिंदर हुंबे, बाळासाहेब घोडके व जेष्ठ , समाजसेवक व गावकऱ्यांच्या मदतीने अखेर रोहन गलांडे पाटील यांनी अमरण उपोषणाला काल स्थगिती दिली यावेळी बोलताना रोहन गलांडे यांनी म्हटले तीर्थक्षेत्र विकास कामाचे यश माझे नसुन लोकशाहीचा चौथा स्तंभ पत्रकार, संपादक, उपसंपादक , न्यूज, पोर्टल व सर्व सहकाऱ्यांचे आहे असे रोहन गलांडे यांनी म्हटले आहे.

## पान ६ वरून...

### शेतकऱ्यांना पिक कर्जासाठी

उमापूर शाखेची उच्चस्तरीय चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत. खरीप हंगामाच्या सुरुवातीला चांगले पर्जन्यमान झाल्यामुळे शेतकऱ्यांनी बी-बियाणे आणि खतांवर मोठा खर्च केला आहे. अनेक शेतकऱ्यांनी यासाठी विविध बँकांकडे पिक कर्जाची मागणी केली आहे. शासनाने सिबील स्कोअर न पाहता पिक कर्ज द्यावे, पिक कर्ज देण्यासाठी शेतकऱ्यांची अडवणुक करू नये असे आदेश दिलेले असतानाही स्टेट बँक ऑफ इंडियाच्या उमापूर शाखेचे व्यवस्थापक भुपेंद्र लारोकर व फिल्ड ऑफिसर लोकेश उईके यांनी तेथील शेकडो शेतकऱ्यांच्या बँक खात्यांना विमा पॉलिसी घेतल्याशिवाय कर्ज रक्कम उचलता येवू नये म्हणून 'होल्ड' लावले होते. या बाबतच्या तक्रारी प्राप्त झाल्यानंतर बीड जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष विजयसिंह पंडित यांनी या बाबत त्यांना जाब विचारल्यानंतर त्यांनी तात्काळ 'होल्ड' उठविले. असे प्रकार गेवराई तालुक्यासह जिल्हाभर सुरु असून बँक अधिकारी विमा पॉलिसीच्या माध्यमातून नवीन व्यवसाय करून शेतकऱ्यांना वेठीस धरत असल्याची तक्रार विजयसिंह पंडित यांनी जिल्हाधिकारी आणि जिल्हा अग्रणी बँकेकडे केली आहे. राष्ट्रीयकृत बँकांच्या विविध शाखांना पिक कर्जासाठी दिलेले टार्गेट त्या पूर्ण करत नसून शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणावर पिळवणुक बँक अधिकारी करत असल्याची तक्रार यावेळी विजयसिंह पंडित यांनी केली. या बाबतचे सविस्तर लेखी निवेदन त्यांनी जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांना दिले. विषयाचे गांभीर्य लक्षात घेवून जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी स्टेट बँक ऑफ इंडियाचे प्रादेशिक व्यवस्थापकांना उमापूर शाखेच्या संशयास्पद व वादग्रस्त कृतीच्या संदर्भात उच्च स्तरीय छाननी व चौकशी करून सात दिवसांत अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत. हा विषय जिल्हाधिकाऱ्यांनी अतिशय गांभीर्याने हाताळल्याबद्दल विजयसिंह पंडित यांनी त्यांचे आभार व्यक्त केले.

### नोकरीला असताना घेतला

पती मयत आहेत. तरी त्यांच्या नावाने दारिद्र रेषा प्रमाणपत्राचा वापर करून घरकूल मंजुर करून घेतले आहे. या प्रकरणात नगर पालिकेकडेही वेळोवेळी तक्रार करण्यात आलेली आहे. संधीत व्यक्ती नोकरीस असतांना शासनाची फसवणूक करून रमाई आवास घरकूल योजनेचा लाभ घेतल्यामुळे एक खऱ्या लाभार्थ्यावर सदर योजनेपासून वंचीत रहावे लागत आहे. या प्रकरणी शासनाची फसवणूक केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करावा, अशी तक्रार हरिशचंद्र विद्यागर यांनी पुराव्यासह शिवाजीनगर पोलीस ठाण्यात केलेली आहे. मात्र सदरील प्रकरण न.प.कार्यालयात झालेल्या फसवणूकीशी संबंधीत असल्याने त्याची हद्द बीड शहर ठाणे आहे, त्या अनुषंगाने शिवाजीनगर पोलीसांनी शहर पोलीसांशी संपर्क करावे असे पत्र विद्यागर यांना देण्यात आले आहे. आता याबाबत विद्यागर हे पोलिसांत तक्रार देण्याबरोबरच जिल्हा प्रशानाकडेही कारवाईची मागणी करणार आहेत.

### आझाद क्रांती सेनेच्या

अखिल बिल्डर हे वंचित उपेक्षित समूहाला न्याय मिळवून देण्यासाठी शहरांमधील प्रत्येक प्रभागातील प्रश्न घेऊन येथील प्रशासनाच्या कानावर सामान्यांचे घराणे घालतील व संघटना मजबुतीसाठी काम करतील असा विश्वास राजेश घोडे यांनी याप्रसंगी व्यक्त केला अखिल बिल्डर यांना आझाद क्रांती सेनेच्या सर्व कार्यकर्त्यांनी शुभेच्छा दिल्या

# राष्ट्रीय लोकअदालतच्या माध्यमातून अनेक वर्षापासून विभक्त असलेल्या ४ दाम्पत्यांचा संसार जुळला

**बीड । प्रतिनिधी**

दिनांक २७ जुलै २०२४ रोजी बीड जिल्हा न्यायालयात व सर्व तालुका न्यायालयात राष्ट्रीय लोकअदालतचे आयोजन करण्यात आले होते. सदर लोकअदालतमध्ये अनेक प्रकरणे तडजोडीसाठी ठेवण्यात आली होती. यामध्ये कौटूंबिक न्यायालय बीड येथील एकूण ४ प्रकरणातील दाम्पत्य अनेक वर्षापासून अत्यंत किरकोळ कारणामुळे विभक्त राहत होते.

दिनांक २७ जुलै २०२४ रोजीच्या लोकअदालतमध्ये एकूण ४ दाम्पत्यांचे संसार जुळविण्यामध्ये यश आले असून यापैकीच एक दाम्पत्य रमेश व राधा यांचा विवाह २००७ मध्ये रितीरिवाजा प्रमाणे झाला व विवाहातून त्यांना दोन अपत्य आहेत. काही वर्ष दोघांचा सुखाचा संसार चालू होता. दोघांनी एकमेकावर विश्वास न ठेवता परस्पर आर्थिक व्यवहार केल्यामुळे दोघांमध्ये वादाला सुरूवात झाली.

दोघांचे आई-वडील व भाउ-बहीण त्यांच्या संसारात दखल देत असल्यामुळे ही भांडणे जास्तच वाढू लागली. दोघांच्या वादाचा परिणाम मुलांवर पण होत होता. दोघे एकमेकाच्या चारित्र्यावर संशय घेउ लागले. रोजच्या घरातील वादामुळे रमेश घर सोडून निघून गेले. यादरम्यान रमेश यांनी कौटुंबिक न्यायालय बीड येथे घटस्फोटासाठी प्रकरण दाखल केले. कौटुंबिक न्यायालयात समुपदेशका समोर प्रकरण आल्यानंतर, दोघांनी एकमेकांच्या घरातील इतर लोकांची त्यांच्या संसारात ढवळाढवळ नको यावर दोघांचे एकमत झाले. सदर प्रकरण लोकन्यायालयात आल्यानंतर दोघे एकमेकासोंबत आनंदाने राहतील आणि त्यांनी एकमेकांवर विश्वास ठेवणार आणि नात्यात पारदर्शकपणा ठेवण्याचे मान्य केले. दोघांनी मिळून हे प्रकरण




न्यायालयातून काढून घ्यायचे असे त्यांचे आपसात ठरले. सदर ४ प्रकरणामध्ये पॅनल प्रमुख, पॅनल सदस्य, दोन्ही पक्षकार व त्यांचे वकील यांनी महत्वपूर्ण भूमिका बजावली.

# मल्टीविटामीन व लोह असलेली कंटूर्ले एक पौष्टिक फळभाजी ग्रामीण भागात कांटूले भाजीला व्हेज चिकन देखील म्हणतात

## कांटूले ही सर्वात शक्तिशाली भाजी; विविध प्रकारच्या १० रोगांवर भारी

**ज्योतीराम पांढरपोटे । माजलगाव**

कंटोला किंवा कटुर्ले नावाने ओळखली जाणारी ही सर्वात शक्तिशाली भाजी मानली जाते.कारण त्यामध्ये मल्टी विटामिन,लोह आणि अनेक पौष्टिक घटक असतात.कांटोला जो कारल्याच्या भाजी सारखा दिसतो,या कांटूले या भाजीमध्ये मोठ्या व भरपूर व्हिटॅमिन सी असते, तिला सर्वोत्तम भाजी म्हणतात. वेगवेगळ्या भागात त्याला वेगवेगळे नाव आहे.जेवणात ती चविष्ट लागते. त्यात आरोग्याचा खजिनाही आहे. लठ्ठपणापासून ते मधुमेह,बीपी नियंत्रण,कॅन्सर,फ्लू यांसारख्या अनेक मोठ्या आजारांवर ती रामबाण उपाय ठरते. बरेच लोक याला व्हेज चिकन देखील म्हणतात. मात्र,ज्या पद्धतीने ते बनवले जाते त्याप्रमाणे त्याची चव वाढते.त्याची लागवड डोंगराळ भागात जास्त होते, म्हणून तिला डोंगराळ भाजी असे देखील म्हणतात. शरीराची रोगप्रतिकारक शक्ती देखील या कांटूले भाजी खाल्याने सुधारते.



वजन नियंत्रित ठेवते

ही भाजी वजन नियंत्रित ठेवते. चयापचय व्यवस्थित राहते.कारल्याच्याभाजी सारखी दिसणारी ही भाजी खाल्ल्यास वजन लवकरच कमी होईल.

डोके दुखीमध्ये आराम

कांटूले या भाजीमुळे डोके दुखीमध्ये आराम मिळतो, मायग्रेन सारखे आजारही दूर होतात.यामध्ये अँटिऑक्सिडेंट गुणधर्म असून फायटोकेमिकल्स आढळतात,त्यामुळे त्वचाही चांगली राहते.

मूळव्याध,कॅन्सर,मधुमेह आणि बीपीही नियंत्रणात

मुळव्याध, बद्धकोष्ठता या तक्रारीतही कांटूले ही भाजी फायदेशीर आहे,ज्यांना मलावरोधाचा त्रास होत असेल त्यांनी हे रोज खावे कारण यामध्ये फायबरचे प्रमाण चांगले असते.फायबर,फॅट आणि प्रथिने भरपूर असतात,त्यामुळे कॅन्सर,मधुमेह आणि बीपीही नियंत्रणात राहतो.कंटूले या भाजीत लोह देखील भरपूर आहे,म्हणून तिला जगातील सर्वात शक्तिशाली भाजी म्हटले जाते.

कसे सेवन करावे

कांटूले भाजी ही भाजी कारल्याच्या भाजी प्रमाणे तेलात तळून खाऊ शकता. याच्या बिया देखील खूप फायदेशीर असतात.





cmyk

राज्य लोकतंत्र
शेत-शिवार
रविवार दि.२८ जुलै २०२४
४

# कोल्हापुरात पंधरा हजार हेक्टरवरील पिके पाण्याखाली

## शेतकरी सापडणार अडचणीत



कोल्हापूर : कोल्हापूर जिल्ह्यात सर्वच नद्यांच्या पाणीपातळीत मोठी वाढ झाल्याने खरीप पिकांसह उसाचे मोठे नुकसान होण्याची शक्यता आहे. जिल्ह्यातील सुमारे पंधरा हजार हेक्टरवरील पिके पाण्याखाली आहेत. यापैकी साठ टक्के क्षेत्र उसाखालचे आहे. तर उर्वरित क्षेत्र भात व अन्य खरीप पिकांचे आहे. नद्यांचे पाणी सर्वदूर पसरल्याने शिवारे पाण्याखाली गेली आहेत. दूध संघांना होणारा लाखो लिटरचा दुधाचा पुरवठाही ठप्प झाल्याने दूध संघाच्या संकलनातही घट झाली आहे.

मागच्या काही दिवसांपासून होत असलेल्या पावसाने कोल्हापूर जिल्ह्यातील अनेक राज्य आणि जिल्हा मार्ग बंद झाले आहेत याचा थेट परिणाम जिल्ह्यातील दूध व्यवसायावर झाला आहे. गोकुळ आणि वारणासारख्या लाखो लिटर दूध संकलन करणाऱ्या संस्थांचे दूध संकलन ग्रामीण भागात होत असते, परंतु पूर परिस्थितीने दूध वाहतूक ठप्प झाली आहे. अतिवृष्टीमुळे जिल्ह्यातील अकरा, तर ३७ जिल्हा मार्ग बंद झाले आहेत. ९१ बंधारे पाण्याखाली आहेत. अलमट्टी धरणातून गुरुवारपासून २ लाख ७५ हजार क्युसेकने विसर्ग सुरू आहे. धरणातून पाण्याचा विसर्ग वाढवण्याबाबत महाराष्ट्र आणि कर्नाटक सरकारबरोबर चर्चा सुरू आहे, अशी माहिती सुत्रांनी दिली. धरणातून गरजेनुसार पाण्याचा विसर्ग वाढविण्यासाठीही चर्चा झाली आहे. कोल्हापूर जिल्ह्यात गोकुळ दूध संघाचे १७ लाख लिटर गाय आणि म्हशीचे संकलन होत असते, परंतु मागच्या काही दिवसांत होत असलेल्या पावसाने काही ग्रामीण भागातील वाहतूक खोळंबली असल्याने दूध संकलनात घट झाली आहे.

पंचगंगा नदीचे पाणी धोकापातळीच्या वरून दोन फूट वाहत असल्याने जिल्ह्यात पूरस्थिती निर्माण झाली आहे. शनिवारच्या आकडेवारीनुसार नदीच्या पाण्याची पातळी ४७ फूटापर्यंत पोहचू लागली आहे. राधानगरी धरणातून पाणी येत असल्याने पंचगंगा नदीच्या पाण्यात गतीने वाढ होत आहे. वारणा व कृष्णा नद्याच्या पाण्यातही वेगात वाढ सुरू आहे. वारणा व कोयना धरणांतून मोठ्या प्रमाणात पाणी सोडण्यात येत असल्याने या दोन्ही नद्यांचे पाणी दोन दिवसांच्या तुलनेत गतीने वाढत आहे.

## सध्याच्या वातावरणात जुन्या द्राक्षबागेची अशी घ्या काळजी



राष्ट्रीय द्राक्ष संशोधन केंद्र यांनी हवामान आणि द्राक्षाच्या वाढीच्या टप्प्यांवर आधारित, द्राक्षबागेसाठी सूचना जारी केलेल्या आहेत जाणून घेऊ या जुन्या द्राक्षबागेत व्यवस्थापन कसे करायचे याविषयी.

जुनी द्राक्ष बाग व्यवस्थापन : नुकत्याच झालेल्या पावसामुळे तापमानात घट झाली आहे आणि द्राक्ष बागेत सापेक्ष आर्द्रता वाढली. वाढलेली आर्द्रता केवडा आणि करपा सारख्या बुरशीजन्य रोगांची निर्मिती करते. ९० दिवसांनी द्राक्ष बागा काडी पक्वतेच्या अवस्थेत असू शकते. जर नवीन वाढ चालू राहिल्यास, काडीची परिपक्वता होण्यास उशीर होईल. शेंडाखुड आणि बगलफूट काढून टाकल्यास ओपन कॅनोपी तयार होण्यास मदत होईल. ज्यामुळे आर्द्रता वाढण्याची शक्यता कमी होते. रोगाचा प्रादुर्भाव कमी होईल. ठिबक द्वारे पोटॅशचा वापर १.० ते १.२५ किलो प्रति एकर आणि फवारणी ३.५ ते ४.० ग्रॅम/लि. पाणी याप्रमाणे केल्यास काडीची परिपक्वता वाढण्यास मदत होईल. अनेक द्राक्ष बागांमध्ये, काडीची अनियमित परिपक्वता अनुभवली जाते. बोर्डो १० दिवसांच्या अंतराने ०.७५ ते १.०% फवारणी केल्यास समस्या नियंत्रणात येण्यास मदत होईल. पाने पिवळी पडणे हे मुळात फेरस, मॅग्नेशियम आणि पालाशच्या कमतरतेमुळे होते. जमिनीत कॅल्शियम कार्बोनेट जास्त प्रमाणात उपलब्ध झाल्यामुळे पोटॅश तयार होते. त्यामुळे, शेणखतामध्ये गंधक मिसळल्यास समस्या दूर होण्यास मदत होईल. सध्या शेणखत वापरणे शक्य होणार नाही अशा स्थितीत ठीबकद्वारे विद्राव्य फेरस आणि मॅग्नेशियम देता येते. काडीची नियमित परिपक्वता येण्यासाठी स्फुरद व पालाश ग्रेड खतांचा वापर करता येतो. तसेच वेलीवरील ताण टाळल्यास ही समस्या निश्चितपणे नियंत्रित होईल तसेच बोर्डेक्स मिश्रणाची ०.७५ ते १.०% फवारणी केल्यास व माती भिजवल्यास देखील नियंत्रित करण्यास मदत करा.

## बनावट कीटकनाशके जप्त

पुणे : कृषी आयुक्तालयाच्या दक्षता पथकाने केलेल्या धाडसी कारवाईत ३५ लाख रुपयांची बनावट कीटकनाशके जप्त केली आहेत. कृषी आयुक्तपदाची सूत्रे रवींद्र बिनवडे यांनी हाती घेताच दक्षता पथकाला कार्यान्वित केल्यामुळे ही कारवाई झाल्याचे सांगण्यात येते. कीटकनाशकाचा साठा पुण्याच्या लोणी काळभोर भागात महादेव फार्मर्स प्रोड्यूसर कंपनीच्या गोदामात लपविण्यात आला होता.

दक्षता पथकाचे अधीक्षक गोविंद मोरे, उपसंचालक किरण जाधव, तंत्र अधिकारी नरेंद्र बारापत्रे व सत्यवान नव्हे यांच्या चमूने सापळा रचून हा साठा जप्त केला. आंबा बागांमध्ये मोहोर आणण्यासाठी राज्यातील शेतकरी मोठ्या प्रमाणात पॅक्लोब्युट्राझोल नावाचे वाढ वृद्धिरोधक वापरतात. याच संधीचा फायदा घेण्यासाठी बनावट कीटकनाशके वापरणाऱ्या टोळीकडून कमी किमतीची रसायने आणली जात होती. ही रसायने म्हणजे आंब्याला मोहर आणणारे पॅक्लोब्युट्राझोल असल्याचे भासवले जात होते. कृषी खात्याच्या म्हणण्यानुसार, शेतकऱ्यांना हे रसायन 'कल्टार' नावाने सर्रास विकले जात होते. या बाबत शोध घेताना गोदाम मालकाने हा साठा दाखवला व पैसे घेऊन येण्यास सांगितले. गोदाम मालकाकडे कीटकनाशके विक्री, साठवणुकीचा परवाना नव्हता. परिस्थितीचा अंदाज घेत कीटकनाशके कायदा १९६८ व कीटकनाशके नियम १९७१ मधील तरतुदींचा भंग होत असल्याचा निष्कर्ष काढत दक्षता पथकाने रसायनांचा साठा तत्काळ जप्त केला. सूत्रांच्या म्हणण्यानुसार, साठा जप्त करण्यात आल्यानंतर तेथे पॅक्लोब्युट्राझोल सोबत इतर बनावट कीटकनाशकेदेखील आढळली. त्यात नॅप्थॅलिक ॲसिटिक ॲसिड, पॉलिथिलिन गायकोल, इमामेक्टिन बेंझोएट, इमिडाक्लोप्रिड, फेनोब्युकार्ब, थायोफोनेट मिथाईल, हेक्झाकोनॅझोल, सायपरमेथ्रिन याचा समावेश होता. शेतकऱ्यांकडून या कीटकनाशकांना मोठी मागणी असते.


अनेक टोळ्या कार्यरत : या कारवाईत जप्त केलेल्या रसायनांचे नमुने आता प्रयोगशाळेकडे तपासणीसाठी पाठविले आहेत. तसेच, फौजदारी दाखल करण्याच्या हालचाली सुरू आहेत. दरम्यान, राज्यात बनावट कीटकनाशके, खते, बियाणे विक्रीत अनेक टोळ्या कार्यरत असल्याचा संशय आहेत. धक्कादायक बाब म्हणजे कृषी खात्यातील काही अधिकारीदेखील या टोळ्यांना सामील आहेत. त्यामुळेच बनावट निविष्ठांची विक्री थांबत नाही, असे सुत्रांचे म्हणणे आहे.



## खरीपातील पिकांचे आणि फळझाडांचे नियोजन; जाणून घ्या कृषी तज्ज्ञांची माहिती

सध्या खरीप पिकांची पेरणी पूर्ण झालेली आहे तर काही ठिकाणी ती सुरु आहे. वेगवेगळ्या खरीप व फळ पिकात आंतर मशागतीची कामे, कीड आणि रोग नियंत्रण फवारणी, सूक्ष्म अन्नद्रव्यांचा वापर व इतर कामे सुरु आहेत. कृषी विद्यापीठातील तज्ज्ञांनी पिकांच्या वेगवेगळ्या अवस्थेत काय काळजी घ्यावी याबद्दल शिफारस केलेली आहे.

खरीप पिकाचे नियोजन : कापूस पिकात रसशोषण करणाऱ्या किडींचा प्रादुर्भाव दिसून येत असल्यास याच्या व्यवस्थापनासाठी ५% निंबोळी अर्काची किंवा ॲसिटामॅप्रिड २० % २ ग्रॅम प्रति १० लिटर किंवा फलोनिकॅमिड ५०% ६० ग्रॅम प्रति एकर पाण्यात मिसळून पावसाची उघड बघून फवारणी करावी. कापूस पिकाची लागवड करून एक महिना झाला असल्यास कोरडवाहू कापसाला ३१ किलो नत्र प्रति हेक्टरी तर बागायती कापसाला ५२ किलो नत्र प्रति हेक्टरी वरखताची मात्रा द्यावी. कापूस पिकात पाणी साचून राहणार नाही याची दक्षता घ्यावी व साचलेल्या अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा. कापूस पिकात जमिनीत वाफसा असताना आंतरमशागतीची कामे करून पीक तण विरहीत ठेवावे. सुक्ष्म अन्नद्रव्याच्या कमतरतेमुळे तूर पिक पिवळे दिसून येत असल्यास याच्या व्यवस्थापनासाठी ईडीटीए चिलेटेड मिक्स मायक्रोन्यूट्रिएंट ग्रेड-२ ५० ग्रॅम किंवा ५० मिली + १९:१९:१९ खत १०० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून पावसाची उघड बघून फवारणी करावी. तूर पिकात जमिनीत वाफसा असताना आंतरमशागतीची कामे करून पीक तण विरहीत ठेवावे. तूर पिकात पाणी साचून राहणार



नाही याची दक्षता घ्यावी व साचलेल्या अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा. मूग/उडीद पिकात जमिनीत वाफसा असताना आंतरमशागतीची कामे करून पीक तण विरहीत ठेवावे. पिकात पाणी साचून राहणार नाही याची दक्षता घ्यावी व साचलेल्या अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा. मूग/उडीद पिकात मावा किडीचा प्रादुर्भाव दिसून येत असल्यास याच्या व्यवस्थापनासाठी ५% निंबोळी अर्काची पावसाची उघड बघून फवारणी करावी. उडीद पिकात करपा रोगाचा प्रादुर्भाव दिसून येत असल्यास याच्या व्यवस्थापनासाठी मॅन्कोझेब २.५ ग्रॅम प्रति लिटर पाण्यात मिसळून पावसाची उघड बघून फवारणी करावी. खोड माशीच्या व्यवस्थापनासाठी क्विनॉलफॉस २५ ईसी किंवा मोनोक्रोटोफॉस ३६ एसएल १ मिली प्रति लिटर पाण्यात मिसळून पावसाची उघड बघून फवारणी करावी. भुईमुग पिकात जमिनीत वापसा असताना आंतरमशागतीची कामे करून पीक तण विरहीत ठेवावे. पिकात पाणी साचून राहणार नाही याची दक्षता घ्यावी व साचलेल्या अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा. मका पिकात जमिनीत वाफसा असताना आंतरमशागतीची कामे करून पीक तण विरहीत ठेवावे. लष्करी अळीचा प्रादुर्भाव दिसून येत असल्यास याच्या व्यवस्थापनासाठी इमामेक्टीन बेन्झोएट ५ टक्के ४ ग्रॅम किंवा स्पिनेटोरम ११.७ एससी ४ मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून वरील कीटकनाशकांची आलटून पालटून पावसाची उघड बघून फवारणी करावी. फवारणी करत असताना किटकनाशक पोंग्यात पडेल अशाप्रकारे फवारणी करावी. मका पिकात पाणी साचून राहणार नाही याची दक्षता घ्यावी व साचलेल्या अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा.

फळबागेचे व्यवस्थापन : केळी बागेत पाणी साचून राहणार नाही याची दक्षता घ्यावी व साचलेल्या अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा. केळी बागेतील रोगग्रस्त पाने काढून टाकावीत. केळी बागेस ५० ग्रॅम यूरिया प्रति झाड खतमात्रा द्यावी. केळी बागेत मर व बुरशीजन्य रोगाच्या व्यवस्थापनासाठी कार्बेन्डाझीम + कॉपर ऑक्सीक्लोराईड २५ ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून पावसाची उघड बघून फवारणी करावी. आंबा बागेत पाणी साचून राहणार नाही याची दक्षता घ्यावी व साचलेल्या अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा.

रस शोषण करणाऱ्या किडींच्या व्यवस्थापनासाठी इमिडाक्लोप्रिड ४ ते ५ मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून पावसाची उघड बघून फवारणी करावी. द्राक्ष बागेत पाणी साचून राहणार नाही याची दक्षता घ्यावी व साचलेल्या अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा. रोगग्रस्त पानाची विरळणी करून घ्यावी. द्राक्ष बागेत मर व बुरशीजन्य रोगाच्या व्यवस्थापनासाठी कार्बेन्डाझीम + कॉपर ऑक्सीक्लोराईड २५ ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून पावसाची उघड बघून फवारणी करावी. सिताफळ बागेत पाणी साचून राहणार नाही याची दक्षता घ्यावी व साचलेल्या अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा. सिताफळ बागेत मर व बुरशीजन्य रोगाच्या व्यवस्थापनासाठी कार्बेन्डाझीम + कॉपर ऑक्सीक्लोराईड २५ ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून पावसाची उघड बघून फवारणी करावी.




### महत्वाच्या घटना

१७६१ : माधवराव बल्लाळ भट ऊर्फ 'थोरले' माधवराव हे मराठा साम्राज्यातील ४ थे पेशवे बनले.
१८६६ : आयर्लंडच्या व्हॅलेन्शिया द्वीपापासून कॅनडातील ट्रिनिटी बेपर्यंत समुद्राखालील तार घालण्याचे काम पूर्ण. युरोप अमेरिकेच्या दरम्यान तारसंदेश पाठवणे शक्य झाले.
१८९० : डच चित्रकार व्हिन्सेंट व्हॅन गॉगने स्वत:वर गोळी झाडुन घेतली. दोन दिवसांनी त्याचे निधन झाले.
१८९७ : बाळ गंगाधर टिळक यांना पहिल्यांदा कैद करण्यात आलं.
१९२१ : रक्तातील साखरेवर 'इन्सुलिन' या संप्रेरकाचे नियंत्रण असते असे टोरांटो विद्यापीठातील सर फ्रेड्रिक बँटिंग आणि चार्ल्स बेस्ट यांनी सिद्ध केले. तसेच त्यांनी 'इन्सुलिन' शुद्ध स्वरुपात विभक्त करण्यात यश मिळवले.
१९४० : ॲनिमेट शॉर्ट फिल्म ए जंगली हेअर मधून बग्स बनी हे पात्र प्रकाशित झाले.
१९४९ : पहिल्या प्रवासी जेट विमान, डी हॅविललँड कॉमेटचे पहिले उड्डाण.
१९५५ : दोस्त राष्ट्रांनी ऑस्ट्रियातुन आपले सैन्य काढुन घेतले.
१९८३ : कोलंबो येथील वेलिकाडा तुरुंगात सिंहली कैद्यांनी १८ तामिळ राजकीय कैद्यांची हत्या केली.
१९८७ : पुरातत्व विभागाच्या संशोधकांना टायटॅनिक जहाजाचा मलबा सापडला.
१९९७ : तामिळनाडुचे मुख्यमंत्री आणि द्रमुकचे अध्यक्ष एम. करुणानिधी यांची सलग सातव्यांदा पक्षाच्या अध्यक्षपदी निवड झाली. हा एक विक्रम आहे.
१९९९ : द्रवखनिज तेलवायूचा वाहनांसाठी इंधन म्हणून वापर करण्याचा प्रस्ताव पेट्रोलिअम मंत्रालयाने मंजूर केला.
२००१ : सार्वजनिक ठिकाणे, शासकीय इमारती, सार्वजनिक वाहने या ठिकाणी सिगारेट, तंबाखू, गुटखा सेवनावर व थुंकण्यावर तसेच या वस्तूंची सार्वजनिक ठिकाणी जाहिरात करण्यावर बंदी घालण्याचा महाराष्ट्र मंत्रीमंडळाचा निर्णय
२०१२ : लंडन येथे ३० व्या येथे ऑलिम्पिक स्पर्धांना सुरुवात झाली.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१६६७ : योहान बर्नोली स्विस गणितज्ञ (मृत्यू: १ जानेवारी १७४८)
१७२४ : राजस्थान मधील मेवाड प्रांताचे शासक महाराणा प्रतापसिंह द्वितीय यांचा जन्मदिन.
१८९९ : ऑस्ट्रेलियन क्रिकेट खेळाडू पर्सी हॉर्नी ब्रूक यांचा जन्म.
१९११ : डॉ. पांडुरंग वासुदेव तथा पां. वा. सुखात्मे आंतरराष्ट्रीय कीर्तीचे संख्याशास्त्रज्ञ व आहारतज्ञ, पद्मभूषण (१९७१) (मृत्यू: २८ जानेवारी १९९७)
१९१३ : भारतीय स्वातंत्र्य चळवळीच्या कार्यकर्त्या कल्पना दत्त यांचा जन्मदिन.
१९१५ : ऑस्ट्रेलियन क्रिकेट खेळाडू जॅक आयव्हरसन यांचा जन्म.
१९४० : भारतीय वंशीय अमेरिकन लेखिका व कादंबरीकार भारती मुखर्जी यांचा जन्मदिन.
१९५० : ग्रामी पुरस्कार सन्मानित उत्कृष्ट हिंदुस्थानी शास्त्रीय संगीत वीणा वादक व्ही. एम. भट्ट यांचा जन्मदिन.
१९५४ : भारतीय वकील आणि राजकारणी जी.एस. बाली यांचा जन्म.
१९५५ : ॲलन बॉर्डर ऑस्ट्रेलियन क्रिकेटपटू
१९६३ : पाकिस्तानी क्रिकेट खेळाडू नवेद अंजुम यांचा जन्म.
१९६७ : भारतीय अभिनेते, दिग्दर्शक, आणि पटकथालेखक राहुल बोस यांचा जन्म.
१९६९ : दक्षिण आफ्रिका क्रिकेट संघातील माजी क्रिकेटपटू व मुंबई इंडियन संघाचे प्रशिक्षक जोंटी रोड्स यांचा जन्मदिन.
१९८३ : भारतीय फुटबॉल खेळाडू सॉकर वेल्हो यांचा जन्म.
१९९० : भारतीय हिंदी चित्रपट अभिनेत्री कृती सॅनॉन यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८४४ : जॉन डाल्टन इंग्लिश भौतिक व रसायनशास्त्रज्ञ (जन्म: ६ सप्टेंबर १७६६)
१८९५ : उस्ताद बंदे अली खाँ बीनकार, किराणा घराण्याचे प्रवर्तक, सूक्ष्म स्वरांचे भान असणारे व मधुर वादन करणारे असा त्यांचा लौकिक होता. पुण्यात नव्या पुलाजवळील दर्ग्याच्या परिसरात उस्ताद बंदे अली खाँ यांची कबर आहे. (जन्म: )
१९३५ : डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पत्नी रमाबाई आंबेडकर यांचे निधन.
१९७५ : त्र्यं. र. ऊर्फ मामासाहेब देवगिरीकर गांधीवादी नेते, खासदार. भारतीय राज्यघटनेचे मराठीत भाषांतर करुन २६ जानेवारी १९५० रोजीच ते वाचकांच्या हातात देण्याचे काम त्यांनी केले. (जन्म:)
१९८० : मोहम्मद रझा पेहलवी इराण देशाचे शेवटचे शासक व शाह ऑफ इराण म्हणून प्रसिद्ध (जन्म: २६ आक्टोबर १९१९)
१९९२ : अमजद खान हिन्दी चित्रपटसृष्टीतील नावाजलेले खलनायक (जन्म: १२ नोव्हेंबर १९४० गझनी, अफगाणिस्तान)
१९९७ : बळवंत लक्ष्मण वष्ट हिंदुत्त्ववादी कार्यकर्ते
२००२ : कृष्णकांत भारताचे १० वे उपराष्ट्रपती (जन्म: २८ फेब्रुवारी १९२७)
२००७ : वामन दत्तात्रय पटवर्धन स्फोटके व शस्त्रास्त्र तज्ञ (जन्म: ३० जानेवारी १९१७)
२०१५ : भारताचे ११ वे राष्ट्रपती ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचे निधन. (जन्म: १५ ऑक्टोबर १९३१). भारतीय सर्वोत्कृष्ट पुरस्कार भारतरत्न, तसचं, पद्मभूषण व पद्म विभूषण पुरस्कार सन्मानित ''मिसाईल मॅन'' म्हणून प्रसिद्ध भारतीय वैज्ञानिक व माजी भारतीय राष्ट्रपती

# तालखेड ग्रामपंचायतचा महाप्रताप

## संपूर्ण गावचे सांडपाणी शेतकऱ्यांच्या शेतात

माजलगाव । प्रतिनिधी

गावाच्या सर्वांगीण विकासासाठी ग्रामपंचायत स्तरावर अनेक योजना राबवून गावकऱ्यांचे हित जोपासण्याचे काम ग्रामपंचायतच्या सरपंच व उपसरपंच आणि सदस्यां मार्फत राबवल्या जातात मात्र तालखेड येथील ग्रामपंचायत ची तऱ्हा निराळीच? आहे गावातील सर्व घाण पाणी गावालागत असलेल्या रामराव राऊत यांच्या शेतात सोडून आपला हटवदी पणा दाखवला आहे . या विषयी वृत्त असे की तालुक्यातील तालखेड येथील रामराव किसन राऊत हे माळी समाजाचे अल्पभूधारक शेतकरी आपल्या कुटुंबा सोबत गावात राहत त्यांची अडीच एकर शेती ही गावातील सावता मंदिर रस्त्यावर त्यांची शेती आहे ते या शेतात पारंपरिक पद्धतीने भाजीपाला आदी ची लागवड करून आपली उपजीविका भागवत आहेत मात्र संपूर्ण गावातील सांड व घाण पाणी ग्रामपंचायत ने जेसीबी द्वारे नाली खोदून मुद्दाम काही विघ्नसंतोषी माणसांनी येणारे पाणी राऊत यांच्या शेतात सोडले आहे याची तक्रार ही त्यांनी सतत लेखी स्वरूपात ग्रामपंचायत व गटविकास अधिकारी माजलगाव यांना वेळोवेळी दिली आहे मात्र आज तगायत या प्रकरणी कुठल्याही प्रकारची कार्यवाही झालीं नसल्याने माझ्या सर्व शेताला तळ्याचे स्वरूप आले असून माझी जमीन पडीक पडल्याने माझ्या वर उपासमातिची वेळ आली असल्याचे रामराव राऊत यांनी सांगितले .





खरं तर ८० टक्के समाज कारण आणि २० टक्के राजकारण हा मूळ मंत्र निवडणूक झाल्यावर वापरून गावातील प्रत्येक नागरिकांचे आरोग्य ,स्वच्छता रस्ते ,नाल्या आदी सह सर्वांगीण विकास साधने हे ग्रामपंचायत व त्यातील सर्व पदाधिकारी यांचे परम कर्तव्य असते मात्र या ठिकाणी नेमकं उलट होत असल्याचे दिसत आहे सरपंच आणि ग्रामपंचायत सचिव यांना वेळोवेळी सांगून ही मंडळी कुठल्याही प्रकारची कार्यवाही होत नसल्याने राऊत यांनी प्रचंड नाराजी व्यक्त केली असून मला न्याय न मिळाल्यास आपण लोकशाही मार्गाने मी कुटुंबासह ग्रामपंचायत कार्यालय तालखेड येथे आमरण उपोषण करू असा इशारा रामराव राऊत यांनी प्रतिनिधी शी बोलताना दिला.

सदरील प्रकरणी रामराव राऊत यांनी गटविकास अधिकारी माजलगाव यांना आपली कैफियत एक पत्राद्वारे मांडली होती यावर कार्यवाही म्हणून यांनी ग्रामपंचायत तालखेड यांना दि २८ मे २०२४ रोजी लेखी आदेश काढून सदरील प्रकरणी तात्काळ कारवाही करावी असा आदेश दिला होता मात्र ग्रामपंचायत चे सरपंच आणि ग्रामसेवक यांनी या आदेशाला केराची टोपली दाखवली आहे मग तिथं सामान्य नागरिकाचं काय असा प्रश्न उपस्थित होतो.

मी वरील प्रश्नी येथील ग्राम सेवक यांच्या शी मोबाईल वरून जाब विचारला तर ग्रामसेवक मोहदयानी मला अरेरावी भाषा वापरून तुला काय करायचे तर कर असा दम दिला त्याची मोबाईल रेकॉर्डिंग ही माझ्याकडे आहे असे रामराव किसन राऊत यांनी सांगितले .

## महादेव महाराजांनी गावागावात भक्तीचे बीजारोपण केले-त्र्यंबक महाराज मातकर



बीड । प्रतिनिधी

श्री क्षेत्र नारायण गडाचे आठवे महंत वै.ह.भ.प.प.पू.श्रीगुरु महादेव महाराज यांनी गावागावात वारकरी संप्रदायाचा प्रसार करून भक्तीचे अलौकिक बीजारोपण केले, असे प्रतिपादन बळवंतराव कदम माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे उपप्राचार्य कीर्तनकार श्री ह.भ.प.त्र्यंबक महाराज मातकर यांनी केले.ते आनंदगाव ( चव्हाणवाडी) येथे महंत वै.महादेव महाराज यांच्या तेराव्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित कीर्तनात बोलत होते.पुण्यतिथीनिमित्त समस्त गावकरी मंडळींनी वै.गुरुवर्य महादेव बाबांच्या प्रतिमेचे विधीवत पूजन करून त्यांच्या चरणी समस्त गावकरी नतमस्तक झाले.हे गाव श्री क्षेत्र नारायण गडाचे निस्सीम भक्त आहे.विद्यमान महंत गुरुवर्य शिवाजी महाराजांच्या मार्गदर्शनाखाली वर्षभर विविध कार्यक्रम आयोजित केले जातात.जगद्गुरु संत श्री तुकाराम महाराज यांच्या,' संताचिये पायी हा माझा विश्वास सर्वभावे दास झालो त्यांचा १ तेचि माझे हीत करिती सकळ जेणे हा गोपाळ कृपा करी २ या अभंगावर अतिशय भावपूर्ण निरूपण केले.

ते पुढे बोलताना म्हणाले,'' की संतांचा अवतारच जगत्? कल्याणासाठी असतो.जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती देह कष्टविती परोपकारे भूतलावर जेजे जीव अवताराला येतात त्यांचे तीन वर्ग पडतात.एक जे स्वतःच्या इच्छेने अवताराला येतात आणि आपले महत्कार्ये संपले की स्वतः निघून जातात त्यांना संत म्हणतात.जगद्गुरू संत श्री तुकाराम महाराज म्हणतात, आम्ही वैकुंठवासी आलो याची कारणासी बोलिले जे ऋषी साच भावे वर्ताया . दुसरा वर्ग पृथ्वीवर पापाचार,अधर्म, अत्याचार, अन्याय, वाढला.पृथ्वीमातेला हे पाप सहन होईनासे झाले की ऋषी, मुनी, साधुसंत, क्षीरसागर निवासी भगवान विष्णूला अवतार घ्यावयास भाग पाडतात.संत तुकाराम महाराज म्हणतात,आणीयला रुपा बळे करोनी खळे हरिदासी आणि तिसरा जो वर्ग आहे त्याला त्याच्या कर्माचा भोग भोगायला जन्माला यावेच लागते.केले कर्म झाले तेचि भागा आले उपजले मेले ऐसे किती याप्रमाणे कर्माचा हिशोब चुकता कराव्याच लागतो. म्हणून मनुष्य जीवन प्राप्त झाल्यावर ते सफल होण्यासाठी कोणावर तरी विश्वास ठेवायचा असतो.आपल्या भोवतालचे जग हे जगवस्तू,जीवस्तू आणि देव यांनी व्यापलेला आहे.अशा स्थितीत आपले परम कल्याण ज्यात होईल त्यावर विश्वास ठेवला पाहिजे. मनुष्याने विश्वास कशावर ठेवावा याचे उत्तर जगद्गुरु संत श्री तुकाराम महाराजांनी या अभंगात दिले आहे.विश्वास कोणावर ठेवावा? का ठेवावा ? याचे विस्तृत निरूपण कीर्तनात केले.किर्तनात साथ संगतीसाठी मृदंगाचार्य ज्ञानेश्वर महाराज भोसकर,गायनाचार्य प्रल्हाद महाराज गायकवाड,प्रभू महाराज महाराज गायकवाड,धनाजी महाराज गायकवाड,कोंडीराम महाराज चव्हाण, जालिंदर महाराज गायकवाड, सखाराम महाराज शिंदे, नारायण महाराज गायकवाड, जगन्नाथ महाराज चव्हाण,उद्धव महाराज चव्हाण, महादेव महाराज चव्हाण, तुकाराम महाराज शिंदे,कोंडीबा महाराज गायकवाड, सूर्यभान महाराज गायकवाड, हार्मोनियम साथ मच्छिंद्र महाराज शिंदे यांची होती.यावेळी सखाराम देवराव शिंदे, भाऊराव चव्हाण, अशोकराव बहीर सर,परसराम चव्हाण, बाळासाहेब गायकवाड, उत्तम चव्हाण, बाबासाहेब गायकवाड यांच्यासह शेकडो गावकरी उपस्थित होते.यावेळी ग्रामस्थांनी महाप्रसादाची व्यवस्था केली होती.

## परवेझ कुरेशी यांची कुरेश कॉन्फरन्सच्या राज्य उपाध्यक्षपदी निवड

बीड । प्रतिनिधी

शहरातील काँग्रेस आयचे नेते परवेझ अहेमद बशीरुद्दीन कुरेशी यांची कुरेश कॉन्फरन्सचे राज्य उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली असून या निमित्ताने समाजातील सर्व स्तरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून पुढील कार्यासाठी शुभेच्छा देण्यात येत आहे.

परवेझ कुरेशी यांचा कुरेश कॉन्फरन्सच्या राज्य उपाध्यक्षपदाचा कार्यकाळ हा २२ जुलै २०२४ ते १५ मे २०२८ पर्यंत राहणार आहे. यावेळी मनोगत व्यक्त करताना परवेझ कुरेशी म्हणाले की, सन १९३६ ते १९५० या दरम्यान मुस्लीम खाटीक यांच्यासह मुस्लीम मागासांना मिळणारी अनुसूचित जातीच्या (एससी) आरक्षणाची सवलत पुन्हा मिळावी यासाठी राज्य सरकारने केंद्राकडे प्रस्ताव पाठवावा यासाठी प्रयत्न करणार आहे. दलित बांधवांप्रमाणे मुस्लीम मागासांना मुख्य प्रवाहात येण्यासाठी शिक्षण, आरक्षण, संरक्षण आणि समर्थन दिले जावे. सन १९५० सालच्या



तत्कालीन राष्ट्रपती डॉ . राजेंद्रप्रसाद यांच्या घटनेखालील अध्यादेशाने मुस्लीम मागासांना मिळणारी अनुसूचित जातीच्या आरक्षणाची सवलत बंद करण्यात आली आहे. ती पूर्ववत सुरू करण्याकरिता सर्व समाजाला सोबत घेऊन संघर्ष करायचा आहे. कुरेश कॉन्फरन्सचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा सुप्रिम कोर्टात वकील असणारे ॲड. सनोबर अली कुरेशी यांनी माझ्यावर टाकलेला विश्वास सार्थ करणार आहे. यावेळी परवेझ कुरेशी यांच्या निवडीबद्दल सादेख खाटीक (राष्ट्रीय उपाध्यक्ष), महेबूब कोथिंबीरे (महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष), इमाम जाफर (मराठवाडा विभागाध्यक्ष), आदित्य दादा पाटील महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस युवक काँग्रेस आय), राजेसाहेब देशमुख जिल्हाध्यक्ष काँग्रेस आय), राहुल सोनवणे (उपाध्यक्ष कांग्रेस आय) यांनी त्यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.यावेळी पुढे बोलताना परवेझ कुरेशी म्हणाले की, मुस्लीम खाटीक समाज, पशुपालक, शेतकरी आणि मांसाहार करणारे बांधव यांच्या सर्व समस्या, प्रश्न, सोडविण्यावर भर देणार आहे. मुस्लीम खाटीक समाजाने बोकड, खरेदी विक्री, मटन विक्री, कोंबड्या, मासे विक्री यापुरतेच मर्यादित न राहता, व्यवस्थेतील प्रत्येक क्षेत्राला आपलेसे करीत आपले जीवनमान उंचवणे आवश्यक आहे. शिक्षण हेच सर्वंकष परिवर्तनाचे मुख्य साधन असल्याने प्रत्येक मुलामुलीला उच्च शिक्षित, उच्च संस्कारीत करणे आवश्यक आहे असे म्हटले. यावेळी रमेश सानप, मोहसीन भाई, जमील भाई, अखील भाई, अमजद भाई, फरहान भाई आदींनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

## सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखान्यात मिल रोलर पूजन कार्यक्रम



माजलगाव । प्रतिनिधी

येथील लोकनेते सुंदरराव सोळंके सहकारी साखर कारखान्यात गळीत हंगाम २०२४-२५ करीना मिल रोलरचे पूजन कारखान्याचे चेअरमन विरेंद्रभैय्या सोळंके यांचे हस्ते दि २५ जुलै २०२४ रोजी दुपारी १.०० वाजता विधिवत पूजनाने संपन्न झाले.गळीत हंगाम २०२४-२५ सुरु करण्याच्या दृष्टीकोणातुन कारखाना, आसवणी प्रकल्प व को.जन प्रकल्पाकडील ओव्हर ऑयलींगची कामे प्रगतीपथावर आहेत.त्याचबरोबर ऊस तोडणी वहातुकीचे कराराचे कामही अंतीम टप्प्यात आहे. कारखान्याचे संस्थापक स्व. सुंदरराव सोळंके साहेब यांच्या कृपाशिर्वादाने तसेच कारखान्याचे मार्गदर्शक आ प्रकाश सोळंके, उपाध्यक्ष साखर संघ,धेर्यशील सोळंके,उपाध्यक्ष जयसिंग सोळंके यांच्या मार्गदर्शनाखाली कारखाना प्रगतीपथावर आहे. आगामी गळीत हंगामासाठी संचालक मंडळाने ६.५० लाख मे. टन ऊस गाळपाचे उद्दिष्ठ ठेवलेले असुन त्यासाठी कारखाना कार्यक्षेत्रातील सभासद, विगर सभासद ऊस उत्पादक शेतक-यांनी आपला ऊस कारखान्यास गळीतास देवुन सहकार्य करणेचे आवाहन कारखान्याचे चेअरमन विरेंद्र सोळंके यांनी केले. या कार्यक्रमास कारखान्याचे संचालक मंडळासह कारखान्याचे कार्यकारी संचालक आर.सी.बड्गुजर,.डी.एम.वरे जनरल मॅनेजर,एस.के.तौर वर्क्स मॅनेजर यांच्यासह सर्व खातेप्रमुख उपखातेप्रमुख, कर्मचारी व कामगार उपस्थीत होते.

## बोलघेवड्या सरकारकडून निदान १५ ऑगस्टला तरी मोफत शालेय गणवेश मिळणार का?

### दिड महिना उलटूनही विद्यार्थी गणवेशाच्या प्रतिक्षेत

लिंबागणेश । प्रतिनिधी

राज्यसरकारने २०२४-२५ या शैक्षणिक वर्षापासून ''एक राज्य एट गणवेश'' योजनेची अंमलबजावणी करण्याचा निर्णय घेतला असुन समग्र शिक्षा अभियान व मोफत गणवेश वाटप योजने अंतर्गत शासकीय आणि स्थानिक स्वराज्य संस्थेच्या इयत्ता पहिली ते आठवी सर्व विद्यार्थ्यांना मोफत गणवेश पुरवठा करण्याचा निर्णय घेण्यात आला असुन यामध्ये एक नियमित गणवेश संच महिला आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून स्थानिक महिला बचत गटांतर्फे शिलाई करून पुरविण्यात येणार आहे.तर स्काऊट या विषयास एक गणवेश संच संबंधित शाळा व्यवस्थापन समिती स्तरावरुन शिलाई करून पुरविण्यात येणार आहे.मात्र शाळा सुरू होऊन दिड महिना तरीही अद्याप विद्यार्थ्यांना गणवेश न मिळाल्याने बोलघेवड्या सरकारकडून निदान १५ ऑगस्ट



स्वातंत्र्यदिनी तरी विद्यार्थ्यांना मोफत शालेय गणवेश मिळणार का?? असा सवाल सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केला आहे.

राज्य शासनाच्या समग्र शिक्षण अभियान व मोफत गणवेश योजने अंतर्गत शालेय विद्यार्थी -विद्यार्थीनींना मोफत गणवेश वाटप करण्यात येते.मात्र यावर्षी शासनाचे धोरण बदलल्याने गणवेशासाठी कापड खरेदी करून ते शिवण्याचे काम स्थानिक बचत गटांना देण्यात येणार आहे.मात्र त्यासाठी आवश्यक निधी शाळेस अद्याप प्राप्त झालेला नाही.त्यामुळे मोफत गणवेश वाटपात विलंब होत आहे. निधी प्राप्त होताच गणवेशाचे वाटप करण्यात येईल असे सहशिक्षक अमर पुरी यांनी सांगितले. दिड महिना झालं आज मिळणं उद्या मिळणं करीत दिड महिना झाला अजुन शाळेतुन मिळाला नाही.लेकरं रोजचं विचारतेत आता विकत घेऊन द्यावा का?? असा सवाल करत पालकांना खिशातुन पैसे खर्च करून गणवेश खरेदी करावा लागतो की काय अशी चिंता सतावत आहे.

## भाई ॲड.नारायण गोले पाटलांना उमेदवारी द्यावी-भाई कोळपे

माजलगाव । प्रतिनिधी

बीड जिल्हा लाल बावट्याचा बालेकिल्ला म्हणून पूर्वी ओळखला जायचा याच बीड जिल्ह्याने सन १९६७ साली थोर स्वातंत्र्य सेनानी प्रति सरकारचे संस्थापक क्रांतिसिंह नाना पाटील यांना लोकसभेत पाठवले, त्यानंतर स्वातंत्र्यसेनानी माजी खासदार गंगाधर आप्पा बुरांडे यांनी देखील जिल्ह्याचे नेतृत्व केले, त्यानंतर गेवराईतून माजी आमदार भाई पवार, चौसाळा मतदारसंघातून माजी आ. भाई जनार्दन तुपे तर बीड विधानसभेत माजी आ.कॉम्रेड काशिनाथराव जाधव यांच्यासह अनेक लालबावट्याचे आमदारही निवडून आले, त्यामुळे बीड जिल्हा लालबावट्याचा बालेकिल्ला समजला जात असे, सन २००४ साली शेकापच्या भाई थावरेंनी याच मतदारसंघात तब्बल ३५ हजार मते मिळवली होती. तर माजलगाव मतदार संघात चौसाळा मतदार संघातील वडवणी व धारूर तालुक्याचा समावेश झालेला असल्याने वडवणी, धारूर या तालुक्यात शेतकरी कामगार पक्षाला मानणारा खूप मोठा वर्ग आहे.

माजलगाव मतदार संघात २०१९ साल च्या विधानसभा निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस, काँग्रेस,शेतकरी कामगार पक्ष आघाडीच्या आ.प्रकाश सोळंके यांना माजलगाव मतदार संघातील जनतेने शरदचंद्रजी पवार साहेब आणि पुरोगामी विचाराचे प्रतिनिधी म्हणून विजयी केले परंतु त्यानंतर आ.प्रकाश सोळंके यांनी अवघ्या काही तासात पहाटेच्या शपथविधीला पाठिंबा दर्शवून भारतीय जनता पक्षाला सहकार्य करण्याची भूमिका घेऊन माजलगाव मतदार संघातील जनतेचा विश्वासघात केला होता, पुढे ईडीच्या भीतीमुळे अजित पवार यांनी भाजप सोबत जाण्याचा घेतलेल्या निर्णयाला संमती दर्शवत आ. प्रकाश सोळंके हे भाजप सोबत गेलेल्या राष्ट्रवादीच्या गटात ईडीच्या भीतीपोटी सामील झाले, केवळ सत्तेचा माग धरून काम करणाऱ्या आमदार प्रकाश सोळंके यांनी माजलगाव मतदार संघातील जनतेच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष करून जनतेला वाऱ्यावर सोडण्याचे पाप केले,परंतु माजलगाव मतदार संघात शेतकरी, कष्टकरी, सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नावर शेतकरी कामगार पक्षाचे लढाऊ नेते भाई ॲड. नारायण गोले पाटील यांनी आपल्या आक्रमक भूमिकेने अनेक मोर्चे , आंदोलने करून प्रशासनासह शासनाला धारेवर धरत शेतकऱ्यांना न्याय मिळवून देत, शेतकऱ्यांची खते बी बियाण्या मध्ये होणारी लूट, प्रशासनातील अधिकारी कर्मचाऱ्यांकडून होणारी लूट थांबवण्याचे काम शेतकरी कामगार पक्षाचे नेते भाई ॲड नारायण गोले पाटील यांनी केले आहे. त्यामुळे महाविकास आघाडीचा माजलगाव विधानसभेचा आश्वासक चेहरा म्हणून जनसामान्यात, शेतकऱ्यांमध्ये त्यांची चांगली प्रतिमा असून सत्तेसाठी नाही तर सत्यासाठी लढणारे धडाडीचे नेते म्हणून त्यांची ओळख सबंध मतदार संघात आहे, विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर अनेक प्रस्थापित राजकीय नेते विविध राजकीय पक्षाची उंबरठे झिजवत असताना प्रमाणिकपणे चळवळीत काम करणारा, धाडसी कार्यकर्ता म्हणून भाई ॲड. नारायण गोले पाटील यांची वेगळी ओळख आहे, नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत माजलगाव मतदार संघातील सर्व प्रस्थापित पुढारी भाजपच्या बाजूने असताना, महाविकास आघाडीच्या खा.बजरंग बप्पा सोनवणे यांना माजलगाव मतदार संघातून चांगले मताधिक्य मिळवून देण्यासाठी गावा-गावात-वाडी-वस्तीत जाऊन केंद्र शासनाच्या शेतकरी विरोधी धोरणाचा पर्दापाश करण्यात त्यांचा मोलाचा वाटा आहे, तसेच आगामी काळात शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नाला वाचा फोडण्यासाठी तसेच माजलगाव मतदार संघातील शेकडो प्रलंबित प्रश्नांवर आवाज उठवण्यासाठी शेतकरी कामगार पक्षाचे नेते भाई ॲड नारायण गोले पाटील यांच्यासारख्या तरुण तडफदार, प्रमाणिक नेतृत्वाची गरज आहे त्यामूळे महाविकास आघाडीचे नेते मा. शरदचंद्रजी पवार साहेब, मा. उद्धवजी ठाकरे साहेब, मा. नाना पटोले साहेब, भाई जयंत पाटील साहेब यांनी भाई ॲड. नारायण गोले पाटील यांच्यासारख्या शेतकरी कुटुंबातील लढवय्या नेत्यास माजलगाव विधानसभेची उमेदवारी द्यावी असे आवाहन प्रसिद्धी पत्रकाद्वारे भाई गणपतराव कोळपे यांनी केले असून लवकरच शेतकरी कामगार पक्षाचे नेते भाई जयंत पाटील यांना भाई मोहन गुंड यांच्या नेतृत्वाखाली माजलगाव मतदार संघातील शेतकरी कामगार पक्षाचे शिष्ट मंडळ भेटून मागणी करणार आहे तसेच बीड जिल्ह्याचे खासदार बजरंग बप्पा सोनवणे, शेतकरी कामगार पक्षाचे नेते भाई मोहन गुंड व माजलगाव मतदार संघातील शेतकरी कामगार पक्षाचे शिष्ट मंडळ यांची महाविकास आघाडीने शेतकरी कामगार पक्षाला माजलगाव मतदार संघ सोडण्याबाबत संयुक्त बैठक होणार असल्याची माहिती भाई गणपतराव कोळपे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे.



## ज्ञानदीप विद्यालयात बालचिमुकल्यांचा कौतुक व गुणगौरव सोहळा



किल्लेधारूर ( प्रतिनिधी )

ज्युनिअर आय.ए.एस व एम. टी. एस. ऑलंपियाड अशा शालेय स्पर्धा परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांना ट्रॉफी, मेडल व प्रमाणपत्र देऊन कौतुक व गुणगौरव करण्यात आला. किल्ले धारूर तालुक्यातील ज्ञानदीप प्राथमिक विद्यालयात इयत्ता पहिली ते सातवी वर्गातील विद्यार्थ्यांचा विविध शालेय स्पर्धा परीक्षांमध्ये यश संपादन केल्याबद्दल त्यांचा गुणगौरव व कौतुक सोहळा आयोजन करण्यात आला होता.

यावेळी प्रथमतः डॉ. ए.पी.जे अब्दुल कलाम व सरस्वती यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून सय्यद शाकेर, अनिल महाजन, रामकिसन चौरे, शैला महाजन , मुख्याध्यापक शाहिद शेख हे मान्यवर उपस्थित होते.

यावेळी पहिली ते सातवी वर्गातील ज्युनियर आय. ए.एस व एम, टी.एस ऑलंपियाड अशा विविध शालेय स्पर्धा परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांना ट्रॉफी, मेडल व प्रमाणपत्र देऊन त्यांचा गुणगौरव करण्यात आला. यावेळी उपस्थित मान्यवर यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करत त्यांना मार्गदर्शन केले व भावी आयुष्यात आधिकरी होण्यासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचलन शिक्षक मुंजाराम निरडे तर प्रस्ताविक शिक्षक सचिन चव्हाण यांनी केले व शेवटी आभार शिक्षक श्री. विठ्ठल सुरवसे यांनी मानले कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी विद्यालयातील सर्व शिक्षकांनी परिश्रम घेतले. यावेळी मोठ्या प्रमाणात विद्यार्थी व शिक्षकवृंद उपस्थित होते.

# आष्टी तालुक्यात अवैध धंदे जोमात तर पोलीसाची भूमिका कोमात?

## तरूण पिढी व्यसनाधीनतेकडे, पोलिस अधीक्षक साहेब तुम्हीच आता लक्ष द्या, नागरिकांनी केली मागणी

**म्हसोबावाडी । प्रतिनिधी**

आष्टी तालुक्यातील आष्टी, कडा व परिसरातील गावात मोठ्या प्रमाणात अवैध धंदे सुरू असून यामध्ये दारू, मटका, झुगार, गांजा विक्री,वाळू, डुबलीकट दारू,वेश्या व्यवसाय राजरोसपणे सुरू असून यामुळे तरुण पिढी व्यसनाधीनतेकडे वळली आहे. सदरील अवैध धंदे जोमात सुरू असून पोलीस याकडे बघ्याची भूमिका दाखवत असल्याचे दिसून येत आहे. पोलिस अधीक्षक साहेब तुम्हीच आता लक्ष द्यावे अशी मागणी नागरिकांतून होत आहे. आष्टी, कडा परिसरातील अनेक गावात हॉटेलच्या नावाखाली राजरोसपणे अवैध धंदे सुरु आहेत. तसेच आष्टी, कडा येथे बाजारपेठ असल्याने खरेदी - विक्रीसाठी येथे महिलांची ही गर्दी असते. परंतु येथे घोटभर पिऊन रस्त्यावर अश्लील शिवीगाळ करत धिंगाणा घालणाऱ्याची संख्या ही कमी नाही. त्यामुळे महिला व विद्यार्थीनीना खाली मान घालून चालावे लागते. तर जामखेड आष्टी कडा अहमदनगर मार्गावरील लॉज मध्ये छुप्या पध्दतीने वेश्या व्यवसाय सुरू असल्याचे बोलले जात आहे. यामुळे या परिसरातील तरुण पिढी व्यसनाधीनते बरोबरच वाममार्गाकडे आकर्षित होताना दिसून येत आहे. अनेक कुटुंब यामुळे उध्वस्त झाली आहे आणि होत असल्याचे दिसून येत आहे.त्यामुळे आष्टी व कडा परिसरातील सर्व अवैध धंदे बंद करण्याची मागणी नागरिकांतून होत आहे.

**आष्टी गावात व परिसरात कोण ते दोन पोलिस कर्मचारी स्वतः हातमिळवणी करून तालुक्यातील अवैध धंद्याला खतपाणी घालत आहेत याची ही चौकशी करण्याची मागणी नागरिकांतून होत आहे.**

**डी वाय एस पी व आष्टी पोलीस निरीक्षक पदे रिक्त असल्याने वचकच नाही**

### डिवायसपी व पोलीस निरीक्षक यांचे पद रिक्त

**आष्टी येथे पोलिस उपविभागीय अधिकारी कार्यालय असून या ठिकाणी डिवायएसपी यांची बदली झाली असून हे पद रिक्त झाले असून तर आष्टी पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक पद रिक्त आहे हे दोन्ही अधिकारी गेल्या पंधरा ते वीस दिवस झाले बदली होऊन तरी नवीन डिवायएसपी व पोलीस निरीक्षक पद भरले नसल्याने कोणाचा वचक राहिला नसल्याचे दिसून येत आहे तर यासाठी नवीन दोन्ही पदांचे अधिकारी यांची नेमणूक करावी अशी मागणी ही सर्वसामान्य जनतेतून केली जात आहे.**



### आझाद क्रांती सेनेच्या शहराध्यक्षपदी अखिल बिल्डर

**माजलगाव । प्रतिनिधी**

येथील आझाद क्रांती सेनेच्या प्रदेश कार्यालया मध्ये अखिल बिल्डर यांची माजलगाव शहर अध्यक्षपदी निवडीचे पत्र सेना प्रमुख राजेश घोडे यांनी देऊन शहराध्यक्षपदी निवड झाल्याचे जाहीर केले येणाऱ्या काळामध्ये ◀◀ पान ३ वर

# आ.पंकजाताई मुंडे यांचा वाढदिवस शालेय साहित्य व खाऊ वाटप करुन साजरा

**म्हसोबावाडी । प्रतिनिधी**

आष्टी तालुक्यातील म्हसोबाची वाडी ग्रामस्थ आणि मुंडे कुटुंबाचे असलेले प्रेम किंवा सौख्य याविषयी संपूर्ण महाराष्ट्राला माहिती आहे एक विशेष उपक्रम घेऊन लोकनेत्या माजी ग्रामविकास मंत्री आमदार पंकजाताई गोपीनाथराव मुंडे ताईसाहेब यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने म्हसोबाचीवाडी येथील जिल्हा परिषद शाळेत शालेय शिक्षण समितीचे अध्यक्ष सुरेश शेकडे, उपाध्यक्ष परमेश्वर बडे आणि मुंडे भक्त माऊली शेकडे यांनी पंकजा ताईंच्या वाढदिवसाच्या दिवशी त्यांनी केलेल्या आव्हानांचा आदर करून कुठल्याही प्रकारचा इतरत्र खर्च न करता शालेय साहित्य वाटप उपक्रम घेऊन ताईंना शोभेल या पध्दतीने हा वाढदिवस साजरा करण्यात आला यावेळी या कार्यक्रमाला आवर्जून उपस्थित म्हसोबाचीवाडीचे सरपंच शिवा भैय्या शेकडे, शाळेचे मुख्याध्यापक लांडगे सर,शेकडे सर,आमटे सर शालेय शिक्षण समितीचे माजी अध्यक्ष भगवान शेकडे एस.टी. ड्रायव्हर शिवदास शेकडे आणि यासह उपस्थित युवा नेते मुरली शेकडे , सतिश, विष्णु, हनुमान,नवनाथ, बापू, गोरख ढाकणे मुंडे कुटुंबांवर प्रेम करणारे सर्व मुंडे भक्त उपस्थित होते यावेळी कार्यक्रमाच्या शेवटी सर्वांनी आपल्या लाडक्या नेत्याला वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या... या कार्यक्रमाचे विशेष आभार शाळेचे मुख्याध्यापक लांडगे सरांनी मानले.



# पाटोदा लोक न्यायालयात सहाशे चार प्रकरण निकाली

**पाटोदा । प्रतिनिधी**

पाटोदा लोक न्यायालय

जिल्हा न्यायालयाचे सुचनेनुसार दिनांक २७/०७/२०२४ रोजी पाटोदा येथील न्यायालयात लोक न्यायालयाचे आयोजन करण्यात आले होते. त्यात एकुण ६०४ प्रकरणे निकाली काढण्या आली. त्यात एकुण ३६८१६५८ रुपयाची वसुली झाली. याबाबत अधिक माहिती अशी की, न्यायालयात प्रलंबित दिवाणी दावे दाखल पुर्व प्रकरणे, बँकेची कर्ज प्रकरणे, चेकबाबतची प्रकरणे, ग्रामपंचायत थकबाकी प्रकरणे, घरगुती कौटुंबीक वाद, पोटगीची प्रकरणे आणि तडजोडपात्र प्रकरणे हे सामोपचाराने आपसात तडजोड करण्यासाठी दिनांक २७.०७.२०२४ रोजी सकाळी १०.३० वाजता लोकन्यायालयाचे आयोजन करण्यात आले होते. सदर न्यायालयात दिवाणी ८५ प्रकरणे, फौजदारी ९ प्रकरणे, बँकेचे ३३ प्रकरणे, तसेच ग्रामपंचायत थकबाकी ४७७ प्रकरणे ईत्यादी प्रकरणे निकाली काढण्यात आली. फौजदारी प्रकरणात रक्कम रुपये ११६२८०० आणि बँक व ग्रामपंचायतचे प्रकरणात थकबाकी रुपये २५,१८,८५८ अशी एकुण ३६८१६५८ रुपयाची वसुली करण्यात आली. या न्यायालयासाठी एकुण २ पॅनल तयार करण्यात आले होते. पॅनल क्रमांक १ वर श्रीमती एस. एन. निकम मॅडम, दिवाणी न्यायाधीश क.स्तर, पाटोदा या होत्या पॅनल मेंबर विधीज्ञ बी. आर. लवुळ हे होते तसेच पॅनल क्रमांक २ वर श्रीमती ए. ए. पाटील मॅडम, सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, पाटोदा या होत्या व पॅनल मेंबर विधीज्ञ बी.डी.तवार हे होते. हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी तालुका वकील संघ, पाटोदा यांच्या विधीज्ञांनी मोलाचे सहकार्य केले. या लोकन्यायालयात विधिज्ञांचा व पक्षकारांचा उत्स्फुर्त प्रतिसाद दिसुन आला.



# दिव्यांग व्यक्तीची आता ऑनलाईन टक्केवारी मिळणार

**जालना । प्रतिनिधी**

जिल्हा रुग्णालय अंतर्गत दिव्यांग व्यक्तींना डॉक्टर मार्फत तपासणी करून टक्केवारी देण्यात येत होती आता राज्य व केंद्राने नवीन नियम प्रमाणे सॉफ्टवेअर मार्फत टक्केवारीचा प्रमाण मिळणार आहे . अशी माहिती अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ राजेंद्र गाडेकर यांनी दिली आहे. ते म्हणाले की या अगोदर डॉक्टर मार्फत तपासणी करून टक्केवारी देण्यात येत होती परंतु आता नवीन सॉफ्टवेअर मध्ये समजणार टक्केवारीचे प्रमाण किती आहे.यामध्ये एजंट व इतर दलालामार्फत दिव्यांग प्रमाणपत्रांमध्ये बोगसगिरी होत होती आता हे बोगसगिरी बंद होणार आहे. आता तपासणी करून सदरील व्यक्तीचे नवीन सॉफ्टवेअर मध्ये माहिती भरून नंतर सदरील व्यक्तीला नवीन सॉफ्टवेअर मार्फत टक्केवारीचे प्रमाण मिळणार आहे. आता डॉक्टरांना टक्केवारी प्रमाण देण्याचा अधिकार राहिला नाही म्हणून नवीन सॉफ्टवेअर आलेला आहे त्याच्यामार्फतच टक्केवारीचा प्रमाण किती आहे ते लक्षात येणार आहे आणि त्याप्रमाणे दिव्यांग व्यक्तीला टक्केवारीचे प्रमाण देण्यात येणार आहे अशी माहिती डॉ. राजेंद्र गाडेकर यांनी दिली आहे.



# नोकरीला असताना घेतला रमाई घरकूलाचा लाभ

## हरिशचंद्र विद्यागर याची कारवाई करण्याची मागणी

**बीड । प्रतिनिधी**

शासकिय नोकरीला असतानाही नगर पालिकेअंतर्गत रमाई आवास योजनेतून घरकूलाचा लाभ घेतल्याचा प्रकार समोर आला असून, या प्रकरणी संबंधीत व्यक्तीविरूध्द शासनाची फसवणूक केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करून कारवाई करावी, अशी मागणी हरिशचंद्र मारोतीराव विद्यागर यांनी पोलीस प्रशासनाकडे केली आहे.

विद्यागर यांनी पोलीस प्रशासनाला दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, पुष्पा जयप्रकाश सोनवणे यांचे वडिलांकडील नाव पुष्पा सुखदेव चक्रे असे असून, त्या शासकीय तंत्रप्रशाला ीड येथे नोकरीस आहेत. त्यांनी सन २०१६-१७ घरकूल पीटीआर क्रमांक १-३-५६९९ या जागेवर घरकूल लाभ घेतलेला आहे. परंतू सदर ठिकाणी दोन मजली इमारत असुन सदर घराची किंमत अंदाजे ७० ते ८० लाख रूपये इतकी आहे. सदर महिलेचे ◀◀ पान ३ वर

# शेतकऱ्यांना पिक कर्जासाठी वेठीस धरणाऱ्या बँक अधिकाऱ्यांवर कारवाई करा

## विजयसिंह पंडित यांची जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी

**गेवराई । प्रतिनिधी**

पिक कर्ज वाटपात राष्ट्रीयकृत बँकांकडून शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणावर आर्थिक पिळवणुक केली जात आहे. पिक कर्जासाठी विमा पॉलिसी अनिवार्य करून बँकेचे अधिकारी पिक कर्जातही पैसे कमविण्याचा नवा उद्योग करत आहेत. पिक कर्जासाठी बँकेच्या प्रत्येक शाखेला दिलेले टार्गेट पूर्ण होत नाही, त्यामुळे पिक कर्ज वाटपात अक्षम्य टाळाटाळ करून शेतकऱ्यांची आर्थिक पिळवणुक करणाऱ्या बँक अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी विजयसिंह पंडित यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे. जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी याप्रकरणी स्टेट बँक ऑफ इंडियाच्या ◀◀ पान ३ वर



# अंबाजोगाईच्या व्यापाऱ्याची बुलढाण्यातील व्यापाऱ्याकडून पावणे चौदा लाखांची फसवणूक

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

अंबाजोगाई - मोंढा भागातील व्यापार्याची विनम बायोरिसर्च कंपनी या नावाने बियाने उत्पादक कंपनी असून या कंपनीला नवतेज सिड्स प्रा.लि.या कंपनीकडून कच्चे बियाणे पुरविले जात होते. परंतु या कंपनीने कच्चा, पायाभूत कांदा व इतर पायाभूत बियाणे खरेदी करण्यासाठी त्यांना १३ लाख ७३ हजार रूपये नगदी व बँक ट्रान्सफर द्वारे दिले. परंतु संबंधीत कंपनीने अंबाजोगाईच्या व्यापार्याला बियाणे पुरवलेच नाहीत. सदरील व्यापार्याने बुलढाणा जिल्ह्यात जाऊन कंपनीचे शहानिशा केली. त्यामुळे अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात या कंपनीच्या मालकाविरोधात फसवणूकीचा गुन्हा दाखल झाला आहे.

अंबाजोगाई शहरातील मोंढा भागात रविंद्र भगवानदास मुंदडा यांचे खते बियाणाचे दुकान असून त्यांनी सन २०२१ मध्ये विनम बायोरिसर्च कंपनी नावाने बियाणे उत्पादक कंपनी सुरू केली. ११ जुलै रोजी नवतेज सिड्स प्रा.लि.गोपाल संजय वाघ (रा.शिवणी पिसा, ता.लोणार जि. बुलढाणा) यांच्याकडून कच्चा पायाभूत कांदा व इतर पायाभूत बियाणे खरेदी करण्याचे समाज माध्यम व कॉल संभाषण द्वारे ठरले होते. त्यासाठी कच्चा कांदा, बियाणे खरेदी करीता आम्ही ऑन्डव्हॉस पोटी १३ लाख ७३ हजार नगदी व बँक ट्रान्सफर द्वारे दिले. परंतु गोपाल संजय वाघ यांनी पायाभूत बियाणे पुरवठा केला नाही. या प्रकरणी २४ जुलै रोजी अंबाजोगाई शहर पोलिस ठाण्यात हजर होऊन नवतेज सिड्स प्रा.लि. हा संचालक गोपाल संजय वाघ याची व कंपनीची चौकशी केली असता वरील नावाची कंपनी व व्यक्ती मिळून आली नाही व ती खोटी असल्याचे आढळुन आले. त्यामुळे शहर पोलिस ठाण्यात वरील कंपनीच्या मालकाविरोधात १३ लाख ७३ हजारांची फसवणूक केली म्हणून व माझ्या कंपनीच्या नावे ५०० ग्रॅमचे ३ हजार कागदी पाउच त्यांनी गायब केले अशी फिर्याद रविंद्र मुंदडा यांनी दिली. सदर फिर्यादीवरून शहर पोलिस ठाण्यात कलम ३१६(२) ३१८ (४) भादवी प्रमाणे गुन्हा दाखल झाला असून पुढील तपास पोलीस उपनिरिक्षक मनोज निलंगेकर हे तपास करत आहेत.

# या तरुणांचा आदर्श नक्कीच बाकी नव्याने तयारी करू पाहणारे विद्यार्थी घ्यावा -सुरेश धस

आष्टी । प्रतिनिधी

अतिशय खडतर परिस्थितीत मेहनत, जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर या सर्वांनी यश संपादन केले आहे. या नव्याने शासकीय प्रशासनात दाखल झालेल्या सर्वांचे अभिनंदन करतोच त्याचबरोबर यांच्या पाठीमागे पहाडाप्रमाणे उभे राहिलेल्या कुटुंबीयांचे ही अभिनंदन करतो व त्यांना खंबीर साथ दिल्याबद्दल आभार व्यक्त करतो.या तरुणांचा आदर्श नक्कीच बाकी नव्याने तयारी करू पाहणारे विद्यार्थी घ्यावा असे प्रतिपादन सुरेश धस यांनी केले.



नव्यानं प्रशासनात दाखल झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ

आष्टी येथे अव्दैतचंद्र निवासस्थानी नव्याने रुजू नव्याने दाखल झालेल्या विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभ प्रसंगी ते बोलत होते. यावेळी उपस्थित विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी माजी मंत्री सुरेश धस यांनी शुभेच्छा दिल्या. यामध्ये रोहन शिवाजीराव भोसले (STI/ -SO), स्वप्नील महारूद्र गुजर, (दुय्यम निबंधक), संतोष पवार (SRPF), दिनेश पवार (SRPF), राहुल काकडे (पोलीस), दिव्या धोंडे (पोलीस), सिया शिंदे (पोलीस), अजित पवार (पोलीस), ◀◀ पान ३ वर

# संत गजानन महाराज मित्रमंडळाकडून वारकऱ्यांसाठी ५१ लिटर चहा

## कपीलधार येथील कमानी जवळ वारकऱ्यांचा केला पाहुणचार

**बीड । प्रतिनिधी**

**श्रीक्षेत्र कपिलधार येथून शनिवारी दुपारी एक वाजता संत गजानन महाराज दिंडीचे कपिलधारवाडी मार्गे पाली गावाकडे प्रस्थान झाले. वाटेत कपिलधारच्या कमानीजवळ बीडच्या टिळकरोड येथील संत गजानन महाराज मित्रमंडळाच्या वतीने पालखी सोहळ्यातील ७०० वारकऱ्यांना ५१ लिटर चहाचा पाहुणचार करण्यात आला.**

संत गजानन महाराज पालखी बीड शहरात आल्यानंतर धोंडीपुरा भागात ठिकठिकाणी वारकऱ्यांसाठी चहा, पाण्याची व्यवस्था केली जाते. टिळकरोड येथील संत गजानन महाराज मित्रमंडळाचाही या सेवेत सहभाग असायचा. परंतु पालखी मार्गावर अनेक ठिकाणी चहा होत असल्याने संत गजानन महाराज मित्रमंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी संस्थानची भेट घेऊन कपिलधारच्या कमानीजवळ पालखीतील वारकऱ्यांना चहा वाटप करण्याची विंनती केली होती.त्यांनतर धोंडीपुरा येथील स्थळ बदलून मागील १९ वर्षापासून संत गजानन महाराज यांची पालखी कपिलधार येथून निघाल्यावर कपीलधार फाटा येथील कमानीजवळ या मित्रमंडळाकडून चहाची व्यवस्था केली जात आहे. पालखीतील वारकऱ्यांना मित्रमंडळाच्या वतीने राजेश बाभुळगावकर, संजय कुलकर्णी, महेश जोशी, अप्पा कारीकर, सिध्देश्वर रामदासी, सुनील ठोंबरे, मयुर भोगे, गणेश रामदासी, शशांक देशपांडे, बालाजी बाभुळगावकर, प्रसाद बाभुळगावकर, अमोघ बाभुळगावकर, वरद कुलकर्णी, बिपीन पटेल, राजकुमार कुलकर्णी, शिवाजी दीक्षित यांनी चहा देत सेवाभाव जपला.



# सहा जणांनी केली गर्भवतीस गंभीर मारहाण

## आरोपींना तात्काळ अटक करण्याची कुटूंबीयांची मागणी; दिंद्रुड पोलीसात सहा जणांवर गुन्हा दाखल

दिंद्रुड । प्रतिनिधी

धारूर तालुक्यातील चाटगाव येथे शेतातील बांधाच्या कारणावरून एका गर्भवती महिलेस सहा जणांनी २० जुलै शनिवार रोजी तुंबळ मारहाण केली. या घटनेत दिंद्रुड पोलिसात सहा जणांविरोधात गुन्हा नोंद करण्यात आला असून सर्व आरोपी फरार आहेत.

येथील अशोक चौरे व भीमराव बाबुराव चौरे हे शेतात एकमेकांचे शेजारी आहेत. गेल्या काही दिवसांपासून शेतातील बांधाच्या कारणावरून दोन्ही परिवारात वाद सुरू होता. यातच २० जुलै रोजी संध्या अशोक चौरे या घरात एकट्या असताना गवळणबाई भिमराव चौरे, रंजना भीमराव चौरे, सतीश भीमराव चौरे, भीमराव बाबुराव चौरे, अंजना गणेश नेमाने, कृष्णा चांगिरे यांनी गर्भवती संध्या यांना गंभीर मारहाण केली. जखमी महिलेस अंबाजोगाई येथील स्वाराती रुग्णालयात दाखल केल्यानंतर २३ जुलै रोजी सर्व आरोपींवर संध्या चौरे यांच्या फिर्यादीवरून गुन्हा नोंद करण्यात आला आहे. मात्र अद्याप सर्व आरोपी फरार असून आरोपींना तात्काळ अटक करण्याची मागणी चौरे परिवाराने केली आहे.

कोणत्याही गर्भवती स्त्रीला मारहाण करणे कायद्याने गंभीर गुन्हा आहे. मात्र कसलीही दया-मया न दाखवता दगडाचं काळीज असलेल्या सहाही आरोपींनी माझ्या पत्नीस तुंबळ मारहाण केली. पोलीस प्रशासनाने फरार आरोपींना तात्काळ गजाआड करून माझी पत्नी व आम्हाला न्याय द्यावा असे मत माध्यमांशी बोलताना संध्या चौरे यांचे पती अशोक चौरे यांनी मांडले.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# पूजा खेडकर कुटुंबियांच्या थर्मोव्हेरिटा कंपनीचा लिलाव होणार? पालिकेकडून कंपनी सील

**पुणे । प्रतिनिधी**

वादग्रस्त I-S अधिकारी पूजा खेडकरांनी अपंगत्वाचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी कंपनीच्या पत्त्याचा वापर केला. त्याच थर्मोव्हेरिटा कंपनीचा आता लिलाव केला जाण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. या कंपनीने गेल्या तीन वर्षांचा २ लाख ७७ हजारांचा कर थकवला आहे. या प्रकरणी पिंपरी पालिकेने कंपनी सील केलेली आहे. मात्र हा कर २१ दिवसांत भरला नाही तर मालमत्तेचा लिलाव केला जातो, त्या नियमानुसार थर्मोव्हेरिटा कंपनीचा लिलाव केला जाऊ शकतो. फक्त पालिका ही इच्छाशक्ती दाखवणार का? याकडे सर्वांचे लक्ष लागून आहे.

खेडकर कुटुंबाची थर्मोव्हेरिटा कंपनी ही अनधिकृत असल्याचं उघड झालं आहे. २ लाख ७७ हजारांचा कर थकवल्याप्रकरणी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने थर्मोव्हेरिटा कंपनी १९ जुलैला सील केली आहे. ही कंपनीच अनधिकृत असल्याचीही माहिती समोर आली होती. रेडझोनमध्ये कंपनी उभारल्यामुळे ती अनधिकृत असल्याचं स्पष्ट झालं होतं.

पूजा खेडकरयांनी दिव्यांग प्रमाणपत्र मिळवण्यासाठी याच थर्मोव्हेरिटा कंपनीचा पत्ता रहिवासी पत्ता म्हणून दिला होता. पिंपरी पालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे यांनी एबीपी माझाला यासंदर्भात एक्सक्लुझिव्ह माहिती दिली आहे. पिंपरी पालिकेचा कर थकवल्याप्रकरणी थर्मोव्हेरिटा कंपनीवर अखेर आज कारवाईचा बडगा उगारला आहे. २ लाख ७७ हजारांचा कर थकविला म्हणून आज कंपनी सील करण्यात आली आहे. आता कंपनी बाबत कोणताही निर्णय घ्यायचा असेल तर खेडकर कुटुंबियांना आधी पालिकेची परवानगी घ्यावी लागणार आहे, सोबतच आधी थकीत कर ही भरावा लागणार आहे. याच कंपनीचा पत्ता वापरून



ख-ड पूजा खेडकर यांनी अपंगत्वाचे प्रमाणपत्र मिळविले आहे. हीच कंपनी अनधिकृत असल्याचं ही समोर आलेलं आहे, त्याअनुषंगाने ही पालिकेकडून कारवाई सुरू आहे.

थर्मोव्हेरिटा कंपनीचा तब्बल २ लाख ७७ हजारांचा कर थकीत

पिंपरी पालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे एबीपी माझाशी बोलताना सांगितलं, रेकॉर्ड तपासल्यानंतर असं दिसून आलं की, २००९ पासून कर भरला जात होता, शेवटचा कर २०२२ मध्ये भरण्यात आला होता. आतापर्यंतचा थकीत कर पाहिला तर तब्बल २ लाख ७७ हजारांचा थकीत कर आहे. त्यामुळे नियमानुसार, प्रॉपर्टी जप्त करण्याची जी कारवाई आहे, ती सुरू करण्यात आली आहे. यासंदर्भात महाराष्ट्र महानगर पालिका अधिनियमात तरतूद आहे. जर एखाद्या प्रॉपर्टीवर कर देण्यात कोणी हलगर्जीपणा करत असेल किंवा कर वेळेत भरत नसेल, तर ती प्रॉपर्टी जंगम मालमत्ता आणि स्थावर मालमत्ता स्थिर करतो, त्या नियमानुसार आपली कारवाई केली जाईल.

कंपनीचा भाग रेड झोनमध्ये

कंपनी ज्या भागात येते, तो भाग रेड झोनमध्ये येतो, त्यामुळे त्या भागातील सर्व कंपन्या अनधिकृत आहेत. त्यामुळे या कंपनीवर कारवाई केली जाईल. नियमांनुसार, अनधिकृत इमारत असेल, तर संबंधित मालकांना एक महिन्यांची नोटीस दिली जाते. त्यानंतर जी काही योग्य कारवाई असले, ती त्यांच्यावर केली जाते., असं पिंपरी पालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे यांनी सांगितलं आहे.

## वाहन चोरीचे तीन गुन्हे उघड करत २ आरोपींना अटक, महाळूंगे एमआयडीसी पोलिसांची कामगिरी

**पुणे । प्रतिनिधी**

महाळूंगे एमआयडीसी पोलिसांनी २ आरोपींना अटक करत त्यांच्याकडून ३ वाहन चोरीचे गुन्हे उघडकीस आणले आहेत. मोसिम अय्याज शेख (वय २७ रा. खंडोबा माळ, चाकण) व आरिफ अफजल शेख, (वय २८ रा. खंडोबा माळ, चाकण ) अशी अटक आरोपींची नावे असून दोघे ही मुलाचे बुलढाणा जिल्ह्यातील रहिवासी आहेत. दोघे चाकण परिसरात खासगी नोकरी करत होते.

पोलिसांनी दिलेल्या माहिती नुसार, पेट्रोलिंग व वेगवेगळ्या ठिकाणी अचानक नाकाबंदी करून तसेच घटना घडलेल्या ठिकाणी सीसीटिव्ही फुटेज पाहुन आरोपीचा शोध घेण्यास सुरुवात केली. त्यावेळी दोन इसम मोटार सायकल चे हॅन्डल लॉक तोडुन चोरुन घेवुन जाताना दिसले. महाळुंगे पोलीस ठाण्याच्या तपास पथकाने आजूबाजूचे सीसीटिव्ही फुटेज पाहात त्यांचा शोध घेतला असता, त्यातील एक इसम हा वोक्स वॅगन कंपनीत दोन दिवस काम करुन काम सोडून गेलेला असल्याचे समजले. त्याचे नाव त्याचे नाव मोसिम अय्याज शेख होते. तपास पथकाने त्याचा शोध घेवुन त्यास चाकण येथून शिताफीने त्यास ताब्यात घेतले. त्यावेळी त्याचा दुसरा साथीदार आरिफ अफजल शेख याच्यासह त्याने मोटारसायकल चोरी केली असल्याचे निष्पन्न झाले.

दोघांना ताब्यात घेवुन त्यांच्याकडे कसून तपास केला असता त्यांचा आणखी दोन मोटारसायकल चोरीच्या गुन्हयात सहभाग असल्याचे निष्पन्न झाले. त्यांच्याकडुन १लाख रुपये किंमतीच्या तीन मोटार सायकल जप्त केल्या. तीन गुन्हे उघडकीस आणण्यात आले आहेत. महाळूंगे एमआयडीसी पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन गिते, सहायक. पोलीस निरीक्षक कल्याण घाडगे, पोलीस हवालदार राजू कोणकेरी, राजु जाधव, अमोल बोराटे, विठ्ठल वडेकर, संतोष चाफळे पोना संतोष काळे, किशोर सांगळे, पोलीस कॉन्स्टेबल शिवाजी लोखंडे, राजेंद्र खेडकर, संतोष वायकर, गणेश गायकवाड, मंगेश कदम, अमोल माटे यांनी केली आहे.

## मी आयएएस आहे, माझ्या नादी लागली तर कामाला लावेन; पुण्यात बनावट महिला अधिकाऱ्याचा धुमाकूळ

**पुणे । प्रतिनिधी**

एकीकडे वादग्रस्त आयएएस अधिकारी पूजा खेडकरचे अनेक कारनामे समोर येत असताना दुसरीकडे पुण्यात एका बनावट आयएएस अधिकारी महिलेने धुमाकूळ घातल्याचं उघडकीस आलं आहे. या महिलेने खासगी सावकारी सुरू केली असून व्याजाच्या नावाखाली अनेक महिलांची लुबाडणूक केल्याचं समोर आलंय. तिच्या विरोधात तक्रार करणाऱ्या महिलेलाही तिने धमकी दिल्याचं उघड झालं.

रेणुका ईश्वर करनुरे असं या बनावट आयएएस अधिकाऱ्याचे नाव आहे. पुण्यातील लोणी काळभोर परिसरात या बनावट आयएएस अधिकाऱ्याने अनेक महिलांना व्याजाने पैसे देत त्यांची




फसवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे.

बनावट I-S करायची खासगी सावकारी

पुण्यातील वडकी परिसरात राहणाऱ्या रेणुका ईश्वर करनुरे या महिलेने परिसरातील अनेक महिलांना व्याजाने पैसे देऊन त्यांच्याकडून दरमहा दहा टक्क्याने पैसे उकळले आहेत. या प्रकरणी रेणुका करनुरेच्या विरोधात एका ३१ वर्षीय महिलेने लोणी काळभोर पोलिसात अवैध सावकारकीचा गुन्हा दाखल केला आहे.

या पीडित महिलेला बनावट आयएस अधिकारी रेणुका हिने दोन लाख ६८ हजार रुपये व्याजाने दिले होते. या बदल्यात पीडितेने बनावट आयएस अधिकारी रेणुकाला आतापर्यंत तीन लाख ४८ हजार रुपये दिले असताना सुद्धा रेणुका हिने आणखीन चार लाख ५५ हजार रुपयाची मागणी करत पिढीतील त्रास देत धमकवण्यास सुरुवात केली. मी आयएएस अधिकारी आहे, माझ्या नादाला लागू नको. तुला कामाला लावेन, माझे पैसे तू ताबडतोब दे असं म्हणत धमकवण्यास सुरुवात केली. या सगळ्या त्रासानंतर पीडित महिलेने लोणी काळभोर पोलिसात गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणी आता बनावट आयएएस अधिकारी रेणुका ईश्वर करनुरे हिच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यानंतर रेणुकाची अनेक प्रकरणे आता समोर येत आहेत.

## सुधा मूर्ती यांना यावर्षीचा लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्कार जाहीर

**पुणे । प्रतिनिधी**

एमपीसीन्यूज – ज्येष्ठ लेखिका सुधा मूर्ती यांना यावर्षीचा लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्कार जाहीर झाला आहे. लोकमान्य टिळक स्मारक ट्रस्टच्या (टिळक स्वराज्य संघ) वतीने शनिवारी या पुरस्काराची घोषणा करण्यात आली.

लोकमान्य टिळक स्मारक ट्रस्टचे विश्वस्त डॉ. रोहित टिळक यांनी शनिवारी पत्रकार परिषदेत या पुरस्काराची घोषणा केली. स्मृतिचिन्ह आणि एक लाख रुपये असे या पुरस्काराचे स्वरूप असणार आहे. नवी दिल्ली येथे या गुरूवार (१ ऑगस्ट) लोकमान्य टिळक यांच्या १०४ व्या पुण्यतिथीनिमित्त या पुरस्काराचे वितरण होणार आहे. सुधा मूर्ती यांना टिळक स्मारक ट्रस्टचे अध्यक्ष डॉ. दीपक टिळक यांच्या हस्ते पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार



पक्षाचे अध्यक्ष शरद पवार, खासदार डॉ. शाहू छत्रपती महाराज, केरळचे माजी गृहमंत्री रमेश चेन्निथला यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून तसेच डॉ. गीताली टिळक, डॉ. प्रणति रोहित टिळक यांच्यासह ट्रस्टचे अन्य विश्वस्त यावेळी उपस्थित असणार आहेत. लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्काराचे यंदाचे ४२ वे वर्ष असून या सोहळ्यात टिळक स्मारक ट्रस्टच्या विश्वस्त डॉ. प्रणति रोहित टिळक यांनी लिहिलेल्या 'लिजेंडरी लोकमान्य' या कॉफीटेबल पुस्तकाचे प्रकाशन प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते होणार आहे. यात लोकमान्यांच्या जीवनातील महत्त्वाच्या घटना आणि छायाचित्रे यांचा समावेश आहे. देशहितासाठी कार्यरत असलेल्या व्यक्तींना १९८३ पासून या पुरस्काराने गौरविण्यात येते. आतापर्यंत एस.एम. जोशी, इंदिरा गांधी, अटल बिहारी वाजपेयी, डॉ. मनमोहन सिंग, प्रणव मुखर्जी, शंकरदयाळ शर्मा, बाळासाहेब देवरस, खान अब्दुल गफारखान, शरदचंद्र पवार, एन. आर. नारायणमूर्ती, जी. माधवन नायर, डॉ. कोटा हरिनारायण, राहुल बजाज, बाबा कल्याणी, ई. श्रीधरन, प्रा. एम.एस. स्वामीनाथन, डॉ. वर्गीस कुरियन यांच्यासह विविध क्षेत्रांतील दिग्गजांना या पुरस्काराने गौरविण्यात आले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना या पुरस्काराने गौरविण्यात आले.

## बेपत्ता उपनिरीक्षक २४ तासात आढळले सुखरूप, पोलिसांनी सोडला सुटकेचा निःश्वास

**पुणे । प्रतिनिधी**

लोणीकंद पोलीस ठाण्याचे तपास पथकाचे उपनिरीक्षक राहुल खंडू कोळपे ( वय ३५ रा. वाघोली ) हे २४ तासानंतर सुखरूप आढळून आले. राहू पिंपळगाव येथून त्यांना पोलीस पथकाने लोणी कंद पोलीस ठाण्यात आणले. तणावातून ते निघून गेले होते.

' पुढील काही काळासाठी मला कोणी कॉल अथवा मेसेज करू नये. ' असे व्हॉटसअप स्टेटस ठेवून ते शुक्रवारी बेपत्ता झाले होते. ते लोणीकंद येथून एका एस टी बस मध्ये बसल्याचे ही कळाले होते. त्यांच्या पत्नीने लोणीकंद पोलीस ठाण्यात हरविल्याची तक्रार दिली होती.



त्यानंतर चार पथके त्यांच्या शोधासाठी फिरत होती. सोशल मिडीयावरही सर्वत्र मेसेज फॉटवर्ड करण्यात आला होता. अखेर राहू पिंपळगाव येथून त्यांनीच मित्राला फोन केला. यानंतर ते राहू पिंपळगाव येथे असल्याची माहिती पोलीसांना मिळाली. लोणीकंद पोलीस पथकाने त्यांना तेथून लोणीकंद पोलीस ठाण्यात आणले. यावेळी पोलीस उपायुक्त विजय मगर, सहायक पोलिस आयुक्त विठ्ठल लबडे हे पोलीस ठाण्यात होते. त्यांच्याशी बोलणे झाल्यानंतर कोळपे हे घरी गेले. २४ तासातच ते मिळून आल्याने पोलिसांनी सुटकेचा निःश्वास सोडला.

## कात्रज येथून पाण्यात वाहून गेलेल्या युवकाचा मृतदेह अखेर सापडला

**पुणे । प्रतिनिधी**

शहरात बुधवारी मुसळधार पाऊस झाला. यामुळे अनेक भागात पाणी वाहून आले होते. यादरम्यान सायंकाळी कात्रज लेकटाऊन येथून एक युवक (अक्षय साळुंखे, वय २६) वाहून गेल्याची नोंद अग्निशमन दल नियंत्रण कक्षात सायंकाळी सहाच्या सुमारास झाली होती.

त्यानूसार त्याचवेळी अग्निशमन दलाकडून प्रथम गंगाधाम अग्निशमन केंद्र येथून वाहन पाठवत शोध घेण्यात आला होता. परंतू, धरण क्षेत्रातून वाढता विसर्ग व पाण्याचा प्रवाह पाहता अनेक अडचणी येत होत्या. त्यामुळे त्यादिवशी शोध घेऊन ही युवक सापडला नाही. दुसऱ्या दिवशी दलाने घटनेचे गांभीर्य ओळखून गंगाधाम व कात्रज अग्निशमन वाहन लेकटाऊन व जनता अग्निशमन वाहन शंकर महाराज मठाजवळ, स्वामी विवेकानंद पुतळा आणि आज कसबा येथील वाहन मनपा जवळील नदीपात्र येथे रस्सी, गळ, लाईफ जॅकेट, लाईफ रिंग याचा वापर करत युध्दपातळीवर शोधकार्य करीत होते.

त्याचवेळी सकाळी १०:०० वाजता मनपा भवनालगत असलेल्या डेंगळे पुलाखाली एक मृतदेह पाण्यात आढळून आला. त्यानंतर अग्निशमन दलाचे जवान यांनी जीवरक्षक राजू काची यांच्या मदतीने सदर युवकाचा मृतदेह बाहेर काढून पोलिसांच्या ताब्यात दिला. सदर घटनेत अग्निशमन प्रमुख देवेंद्र पोटफोडे यांच्या मार्गदर्शनाखाली अग्निशमन अधिकारी सुभाष जाधव, प्रदिप खेडेकर, सुनिल नाईकनवरे, कमलेश चौधरी आणि सुमारे वीसच्या आसपास जवान यांनी सहभाग घेतला. तसेच या घटनेत पोलिस विभाग, जीवरक्षक, ड्रेनेज विभाग यांचे ही सहकार्य लाभले

## विठ्ठलवाडी चा सांडपाण्याचा प्रश्न मार्गी लावणार; जिल्हाध्यक्ष जयप्रकाश सातव पाटील यांची ग्वाही

**वाघोली । प्रतिनिधी**

पुणे शहरात दोन दिवस झालेल्या पावसाने वाघोली येथील विठ्ठलवाडी, शौर्य हॉटेल, शिवनेरी हॉटेल, आजूबाजूच्या परिसरात सोसायट्यांमध्ये व मोकळ्या जागांमध्ये मोठ्या प्रमाणात पाणी साचले होते. पुणे महानगरपालिका, सार्वजनिक बांधकाम विभाग, पी एम आर डी ए विभाग, तसेच जयप्रकाश सातव मित्रपरिवार यांच्या माध्यमातून तातडीने पावसाचे पाणी दूर करून नागरिकांना दिलासा देण्यात भाजपचे व्यापारी आघाडीचे जिल्हाध्यक्ष जयप्रकाश सातव पाटील यांना यश मिळाले आहे. भर पावसात नागरिकांना केलेल्या मदतीमुळे सातव पाटील यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

याबाबतीत जयप्रकाश सातव पाटील यांनी सांगितले की अनेक ठिकाणी मोकळ्या जागांमध्ये, नागरिकांच्या घरात व पुणे नगर रस्त्यालगत पावसाचे पाणी साठल्याने नागरिकांची मोठ्या प्रमाणात गैरसोय झाली होती. पीडब्ल्यूडी चे उच्च अधिकारी आर वाय पाटील यांच्याशी संपर्क करून त्यांच्या माध्यमातून आजूबाजूच्या परिसरातील वाहतुकीला तसेच नागरिकांना अडथळा ठरणाऱ्या पाण्याचा मार्ग मोकळा करून दिल्याने नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. यावेळी युवराज सातव, पुष्कराज सावंत, नंदकुमार कटके, संदीप कटके, कैलास पवार व पीडब्ल्यूडी चे इंजिनियर व हॉटेल मालक आदींच्या उपस्थितीत जयप्रकाश सातव यांनी विठ्ठलवाडी आणि परिसरातील भागात सांडपाण्याबाबत भेटी देऊन परिस्थितीचा आढावा घेऊन या पुढील काळात पुणे मनपा प्रशासन सार्वजनिक बांधकाम विभाग व पीएमआरडी यांच्या संयुक्त विद्यमाने विठ्ठलवाडी आणि परिसरातील सांडपाण्याचा प्रश्न मार्गी लावणार सातव असल्याचे सांगितले आहे

## भाजपचा भ्रष्ट कारभार पूरस्थितीला जबाबदार-मोहन जोशी

**पुणे । प्रतिनिधी**

गेल्या दोन दिवसांत शहरात पडलेल्या पावसामुळे नागरी सुविधांचा बट्ट्याबोळ उडाला. चार जण दगावले तर अनेकांच्या मालमत्तेचे अतोनात नुकसान झाले. या सर्व परिस्थितीला गेली सात वर्षे चाललेला



भाजपचा भ्रष्ट आणि नियोजनशून्य कारभार जबाबदार आहे, असा आरोप माजी आमदार आणि काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष मोहन जोशी यांनी पत्रकाद्वारे केला आहे.

या पूरस्थितीला सामोरे जाताना केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ आणि पालकमंत्री अजित पवार यांनी अधिकाऱ्यांच्या स्वतंत्रपणे बैठका घेतल्या. बिकट प्रसंगातही दोन मंत्र्यांमध्ये समन्वय नसल्याचेच या बैठकांमधून दिसून आले. आपापल्या पक्षाला श्रेय घेण्यासाठी पूरग्रस्तांना वेठीस धरण्याचे काम त्यांनी केले. त्यामुळे पुणेकरांपुढे प्रश्न निर्माण झाला की, पालकमंत्री कोण? पवार की मोहोळ? खडकवासला धरणातून पाणी नदीत सोडले. त्याबाबत नागरिकांना पूर्वसूचना देण्यात आल्या नाहीत, अशा नागरिकांच्या तक्रारी आहेत. याबाबतही दोन मंत्र्यांची विधाने विसंगत आहेत, असे जोशी यांनी पत्रकात म्हटले आहे.

## पर्यटन बंदी झुगारून मावळात अतिउत्साही पर्यटकांची हजेरी, जिल्हाधिकाऱ्यांचे नियम धाब्यावर

**पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी**

पुणे जिल्ह्यातील मावळ आणि मुळशी तालुक्यात पर्यटनाला बंदी घालण्यात आली आहे. मात्र अतिउत्साही पर्यटकांनी पर्यटनस्थळी हजेरी लावल्याचं दृश्य दिसून येत आहे. प्रशासनाच्या सुचनांना केराची टोपली दाखवत, हे पर्यटक स्वतःच्या जीवाशी खेळताना दिसून येत आहेत. गेली चार दिवस पावसाने पुणे जिल्ह्याला झोडपून काढलं. अशात परिस्थिती कधीही हाताबाहेर जाऊ शकते, हे पाहून मावळ आणि मुळशी तालुक्यात २९ जुलैपर्यंत पर्यटनाला बंदी घालण्यात आली आहे. मात्र हा बंदीचा आदेश झुगारून, आज शनिवारच्या सुट्टीचा मुहूर्त साधत अतिउत्साही पर्यटकांनी कुंडमळा इथं हजेरी लावली आहे.

प्रशासनाने संभाव्य धोका टाळण्यासाठी ही बंदी घातली आहे, याची कल्पना असताना हे असे काही पर्यटक अशा ठिकाणांना भेटी देताना दिसत आहेत. मग अशावेळी पाण्याच्या प्रवाहात कोणी अडकलं तर मग मात्र प्रशासनाला जबाबदार धरले जाते. परंतु तशी वेळचं येऊ नये, याची खबरदारी मात्र पर्यटक घेताना दिसत नाहीत. पर्यटनस्थळांवर जाण्यासाठी बंदी घालण्यात आली आहे. भर



पावसात अनेक पर्यटक हे पुणे जिल्ह्यातील पर्यटन स्थळांना भेटी देत आहेत. मात्र, या ठिकाणी पाण्याचा प्रवाह वाढल्याने खबरदारीचा उपाय म्हणून पुणे जिल्ह्यातील सर्व पर्यटन स्थळे ही पुढील दोन दिवसांसाठी बंद करण्यात आली आहेत. नागरिकांनी सहकार्य करून अशा धोकादायक स्थळी जाण्याचे टाळावे असे पुण्याचे जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी केले आहे.

लोणावळ्यासह शहर परिसरातील पर्टनस्थळांवर जाण्यासाठी बंदी

लोणावळ्यातील सहारा पूल, भुशी धरण, लाईन्स पॉईंट या परिसरामध्ये दोन दिवस मुसळधार पाऊस कोसळत होता. या भागांत असणारे धबधबे मोठ्या प्रमाणात प्रवाहित झाले आहेत. या ठिकाणी जीवितहानी व धोका निर्माण होऊ नये याकरिता सुरक्षेच्या कारणास्तव या सर्व परिसरामध्ये पर्यटकांना जाण्यास बंदी घालण्यात आली आहे. लोणावळा धरणाच्या पायथ्याशी लोणावळा पोलिसांनी चेक पोस्ट लावत सर्व पर्यटक वाहने व इतर सर्व प्रकारच्या वाहनांना पुढे जाण्यास मज्जाव करण्यात आला आहे. मावळ प्रांताधिकारी यांनी २५ जुलै ते २९ जुलै दरम्यान मावळ व मुळशी तालुक्यातील सर्व पर्यटन स्थळे सुरक्षेच्या कारणास्तव बंद ठेवण्याबाबत आदेश देण्यात आलेले आहेत.

## तेजस्विनीची राज्य ज्युनियर मुलींच्या कर्णधारपदी निवड पुण्यातील ४ खेळाडूंचा समावेश

पुणे । प्रतिनिधी

बेळगाव, कर्नाटक येथे होणार्या ज्युनियर मुलींच्या राष्ट्रीय फुटबॉल स्पर्धेसाठी महाराष्ट्राच्या मुली संघाच्या कर्णधारपदी पुण्याच्या तेजस्विनी थाप्पा हिची निवड करण्यात आली आहे. ही स्पर्धा २९ जुलै ते २ ऑगस्टदरम्यान स्पोर्टिंग प्लॅनेट लव्हडेल सेंट्रल स्कूल मैदानावर खेळली जाणार आहे.



वेस्टर्न इंडिया फुटबॉल असोसिएशनने (विफा) निवडलेल्या महाराष्ट्राच्या २२ सदस्यीय संघात नवमी शानभाग, दिया पाययप्पिल्ली (बचावपटू), तेजस्विनी, थाप्पा – कर्णधार, तनिषा अजमेरा (मिडफिल्ड) या पुण्याच्या चार खेळाडूंचा समावेश आहे. महाराष्ट्राच्या खेळाडूंचे सराव शिबीर आणि निवडचाचणी कोल्हापूर येथे घेण्यात आली. त्यातून संघनिवड करण्यात आली. राष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्राचा समावेश ब गटात असून त्यात राजस्थान, त्रिपुरा आणि पाँडेचेरी हे संघ आहेत.